णूस शनिवार । ७ ऑक्टोबर १९७२ । पन्नास पैसे













शामरावांची दैनंदिनी

पन्नास पैसे

शनिवार
७ ऑक्टोबर १९७२

संपादक
श्री. ग. माजगावकर

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : एकोणीस

## सप्रेम नमस्कार....

□ दि. २३ सप्टेंबर १९७२ च्या माणूसच्या अंकात, 'पाक युद्धकैद्यांची अमानुष गुन्हेगारी' हा म. श्री. दीक्षित यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात पाक लष्कराने केलेल्या राक्षसी अत्याचारांच्या त्यांनी दिलेल्या माहितीत नाविन्य असे काही नाही कारण ह्या सर्व हकिकती यापूर्वीच अनेक वर्तमानपत्रांतून व नियतकालिकांतूनही प्रसिद्ध झालेल्या आहेत. मात्र युद्ध-गुन्हेगारांवर खटले भरून त्यांना शिक्षा केला पाहिजे या त्यांच्या विचाराशी आम्ही पूर्णत: संमत आहोत. एवढे मान्य केल्यावर श्री. दीक्षित यांनी लेखाच्या शेवटी जे एक विधान केले आहे ते वस्तुस्थितीला धरून नसल्यामुळे त्याची दखल घेऊन काही खुलासा करणे आवश्यक आहे असे वाटते.

या लेखात श्री. दीक्षित म्हणतात की, 'भारतीय मुसलमान या अमानुष गुन्हेगारीविरुद्ध ब्र काढीत नाहीत. कोणा जबाबदार मुस्लिमाने, मुस्लिम देशाने अथवा मुस्लिम संस्थेने निषेधाचा आवाज उठविला नाही किंवा चौकशीची मागणी केली नाही.' हे विधान अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितीवर आधारलेले आहे. दहा-पंधरा वर्षांपूर्वी असे विधान केले गेले असते तर ते खरे आहे असेच म्हणावे लागले असते. परंतु आज या

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

[ मी नेताजींना बघितलंय – जबानी दुसरी, हप्ता तिसरा या अंकी जागेअभावी प्रसिद्ध होऊ शकला नाही. क्षमस्व. ]

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

परिस्थितीत थोडा का होईना फरक पडला आहे याची जाणीव श्री. दीक्षितांना आहे. असे त्यांच्या प्रस्तुतच्या लेखावरून तरी वाटत नाही. कारण अनेक जबाबदार मुस्लिम व्यक्तींनी व निदान एकातरी मुस्लिम संघटनेने (मुस्लीम देशांचा विचार येथे करण्याचे कारण नाही) निषेधाचा आवाज उठविला होता याचा काहीही उल्लेख प्रस्तुत लेखात नाही. श्री. महंमद करीम छगला (भारताचे माजी शिक्षणमंत्री) श्री. एम. आर. ए. बेग, (माजी चीफ ऑफ प्रोटोकल, भारत सरकार), प्रा. ए. ए. ए. फैजी, (भारताचे इजिप्त मधील माजी हायकमिशनर) श्री. हमीद दलवाई इत्यादी मान्यवर व मातबर व्यक्तींनी पाकिस्तानी लष्कराच्या अत्याचारांचा निःसंदिग्ध शब्दात निषेध केलेला आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळानेही अशीच स्पष्ट भूमिका घेऊन या अत्याचारांचा निषेध केलेला आहे. इतकेच नव्हे तर युद्धकैद्यांवर खटले भरून त्यांना शिक्षा करावी हीच मंडळाची भूमिका आहे. श्री. हमीद दलवाईनींही या अत्याचारांचा निषेध केला असून, पाकिस्तानी युद्धकैद्यांवर खटले भरून त्यांना शिक्षा झाली पाहिजे असे आपले मत असल्याचे अनेक जाहीर सभातून व इतरत्रही सांगितले आहे. इतकेच नव्हे, तर बांगला देशात या युद्धकैद्यांवर खटले भरू नयेत असे दडपण अनेक पाश्चात्त्य राष्ट्रे आणीत आहेत त्या विषयी बोलताना त्यांनी अशाच एका जाहीर सभेत म्हटले होते, की 'दुसऱ्या महायुद्धातील जर्मन युद्धकैद्यांवर खटले भरताना या राष्ट्रांची ही मानवतावादी वृत्ती कुठे गेली होती. त्यावेळेस या युद्धगुन्हेगारांना माफी द्यावीं अशी भूमीका या राष्ट्रांनी का घेतली नाही ?

अर्थात सगळ्याच जाहिर सभांचा वृत्तांत वर्तमानपत्रात येतोच असे नाही. त्यामुळे ही विधाने श्री. दीक्षितांच्या वाचनात वा ऐकण्यात आली नसण्याची शक्यता आहे. म्हणूनच त्यांच्या माहितीकरता ती इथे मुद्दाम उद्धृत केली आहेत.

याबरोबरच, निषेधाचा हा आवाज क्षीण आहे याचीही जाणीव आम्हाला आहे. परंतु यातून मुसलमानांत निर्माण झालेली जी एक नवी प्रवृत्ती दिसून येते ती या समाजात होऊ घातलेल्या वैचारिक क्रांतीची द्योतक आहे याबद्दल दुमत होईलसे वाटत नाही. म्हणूनच त्याची दखल सर्वांनीच घेतली पाहिजे असे वाटते.

अब्दुल कादर मुकादम
सरचिटणीस
मुस्लिम सत्यशोधक मंडळ

## खऱ्या पिराची कथा !

□ २३ सप्टेंबर १९७२ च्या 'माणूस' मधील डॉ. बाबा आढाव यांचा 'सत्यनारायण पूजा बंदी हवी' हा लेख वाचला, सत्यनारायणाच्या पूजेचे प्रस्थ आता इतके वाढले आहे, की तिला बंदी हवी असे डॉ. बाबा आढावांनी म्हटल्याचे वाचून पुष्कळ सत्यनारायणभक्तांच्या डोक्यात तिडीक उठली असेल.

डॉ.बाबा आढावांनी सत्यनारायणाच्या

पूजेला बंदी हवी म्हटले, तरी आता ह्या पूजेचे मूळ इतके खोल गेले आहे, की ते कोणी उपटू शकेल असे वाटत नाही, म्हणूनच तिच्यावर बंदी होण्याची शक्यताही वाटत नाही.

डॉ. आढाव यांची ही सूचना अत्यंत हितकारी आहे यात शंका नाही. कारण ह्या उपटसुंभ सत्यनारायणाने आता इतर साऱ्या देवांवर कुरघोडी केल्याचे दिसते !

डॉ. आढाव यांनी म्हटल्याप्रमाणे केवळ १००–१२५ वर्षांतीलच ह्या देवाची ही पूजा आहे. त्या पूर्वीच्या इतिहासात तिचा आढळ होत नाही. मात्र डॉ आढावांनी 'सत्यशोधक चळवळीच्या काळात हे सत्यनारायणाचे पिल्लू बहुजन समाजाच्या घरात शिरले' हे जे म्हटले आहे, त्याचे हंसू येते. देवाच्या पूजेसाठी दलाल नको म्हणणाऱ्या सत्यशोधक लोकांनी केवळ उपाध्यायाच्या – दलालाच्या – पोटाची सोय करणाऱ्या ह्या भाकडकथांनी भरलेल्या पूजेला आपल्या घरात घेतले असे म्हणणे कितपत योग्य होईल ?

डॉ. बाबा आढाव यांच्या वाचनात आले नसावे, काही वर्षांपूर्वी एका नियत कालिकात एका पंडिताने ह्या सत्यनारायणाच्या कथेचे मूळ लिहिले होते. त्याने म्हटले होते, की ही कथा अलिकडेच बंगालमधून आपल्याकडे आलेली आहे. साचा पारेर कथा म्हणजे खऱ्या पिराची कथा ह्या नावाने तिकडे ती मुसलमान लोकात प्रचलित होती. सत्यनारायणाच्या कथेतील पात्रे आणि त्यांची पार्श्वभूमी लक्षात घेतली म्हणजे ही कथा महाराष्ट्रात येण्यापूर्वी बंगालमध्येच प्रचलित असावी, यात शंका वाटत नाही.

साधुवाणी आणि त्याची पत्नी लीलावती व कन्या कलावती आणि साधुवाण्याचा व त्याच्या जावयाचा नद्यातून नावा भरून चालणारा व्यापार हे बंगाल्यातच शक्य आहे. दळणवळणासाठी उपयोगी पडणाऱ्या नद्या तिकडेच आहेत, आपल्याकडे नाहीत. उल्कामुख राजा नदीच्या तीरावरच पूजा करीत होता. अंगध्वज राजाही तिकडचाच. अंग आणि बंग हे लगतचेच प्रदेश.

बंगालमधील मुसलमान हे अरबस्तान किंवा तुर्कस्तान येथील कडवे लोक नव्हते, ते साचा पीराची पूजा करणे आणि त्यासाठी कथा तयार करणे शक्य आहे त्यांच्या मूळ कथेतील पात्रे हिंदूंनी बदलली असतील !

काही असले तरी सत्यनारायणाची कथा ही अत्यंत मूर्खपणाची आणि अंधःश्रद्धेला पाणी घालणारी कथा असल्याने कोणीही बुद्धिवादी तिचा स्वीकार करणार नाही. ही कथा केवळ काल्पनिक असल्याने तिच्यासाठी घातली जाणारी पूजा मुळीच पुण्यप्रद होणार नाही.

डॉ. बाबा आढाव म्हणतात त्याप्रमाणे शहाण्या माणसांनी तरी ह्या पूजेच्या फंदात पडू नये, तिच्यावर बहिष्कारच घालावा, असे मला वाटते.

कृ. भा. बाबर, पुणे.

मुक्काम नांदिया, शहादे

# १ ऑक्टोबर सत्याग्रहामागील भूमिका

शहादे विभागात सातपुड्याच्या कुशीत दडलेली बरीच गावे ही जंगल विभागात मोडतात. आपल्या कुटुंबाला न पुरणारी थोडीशी जमीन असलेली अनेक कुटुंबे त्या भागात राहतात. शिवाय दर गावातील सुमारे अर्धी कुटुंबे ही काहीच जमीन नसलेली अशी भूमिहीन कुटुंबे आहेत. ह्या लोकांना मजुरी देण्याइतपत मोठे खातेदार ह्या विभागात नाहीत. त्यामुळे जंगलातील झाडे तोडून त्याची मोळी मैल मैल चालत येऊन मोठ्या गावात विकणे, विकली गेल्यास कसेबसे पोट भरणे हा या लोकांचा दिनक्रम असतो. लाकडे तोडून मोळी विकण्यास दोन दिवस खर्ची पडतात. मोळी आणण्याचे काम अत्यंत कष्टाचे असते. शिवाय मोळी आणताना त्यांना जंगलच्या रक्षकांच्या अडवणूकीशी सामना द्यावा लागतो. मोळी आणताना पकडले तर ती जप्त केली जाते किंवा दंड केला जातो. अशा तऱ्हेने ह्या भूमिहीनांचे जीवन अत्यंत हाल-अपेष्टांचे असते.

जंगल-खात्यातील अधिकाऱ्यांचे हात वरपासून खालपर्यंत बरबटलेले आहेत. गरीब भूमिहीनांना 'तू मला पैसे दे, मी तुला जमीन देतो,' अशी भूल पाडून अधिकाऱ्यांनी शेकडो रुपये खाल्ले आहेत. या व्यतिरिक्त मोळी विकताना अडवून पैसे मागणे, त्यांच्या घरातून धान्याची वर्गणी गोळा करणे, कोंबडी-दारूची मागणी करणे, ह्या गोष्टी सर्रास चालतात. एवढे करून गरीब भूमिहीनांना जमीन मिळत नाही. तर ती मिळते जोगी महाराजाला. हा जोगी महाराज सातपिप्री या ठिकाणी राहतो व बेकायदेशीरपणे जमीन कसतो. सुमारे ३० एकर जमीन त्याच्या ताब्यात आहे. दरवर्षी माफक दंड भरून शेकडो रुपयांचे उत्पन्न तो खातो. देवीच्या आदेशाने जमीन खंडत आहे असे सर्वांना सांगतो. इतरही गावातील काही लोक जंगल-रक्षकांच्या छुप्या संमतीने जमीन कसतात. त्यांना मधून मधून पकडून माफक दंड केला जातो. अशा गोष्टी चालू देण्यात जंगल-खात्याला काहीच गैर वाटत नाही.

आर्थिक परिस्थितीने गांजलेले अनेक लोक मोळ्या विकत असल्याने गेल्या बऱ्याच वर्षांत सातपुड्याच्या जंगलाची पीछेहाट व हानी होत आहे. जोपर्यंत त्याना जमीन किंवा दुसरा कामधंदा मिळत नाही, तोपर्यंत त्यांची गरिबी दूर हटणार नाही व सर्वस्वी जंगलातील

लाकूड-तोडीवर त्यांना अवलंबून राहावे लागेल. त्यांना जमीन न वाटता व कोणताच कायम रोजगार न पुरवता नुसती तोडबंदी करून जंगलाचे संरक्षण करणे ही एक अशक्य व हास्यास्पद गोष्ट आहे. म्हणून पर्यायाने जंगलाच्या पीछेहाटीस सरकारच कारणीभूत आहे असे म्हणावे लागते. या व्यतिरिक्त जंगल-खात्याकडून जंगलवाढ व रक्षण याकरता कोणतेच विशेष प्रयत्न किंवा कार्यक्रम झालेले दिसत नाहीत.

भूते आकसपूर ते गणार या भागात सुमारे १०,००० एकर जमीन ही जंगल खात्याकडे आहे. ह्या जमिनीवरती, कागदोपत्री नकाशावरती जरी सागाचे जंगल दाखविले असले तरी प्रत्यक्षात सुमारे ४००० एकर जमीन पडीत आहे. त्यामध्ये लहान झुडुपे किंवा बिगर उत्पन्नाची झाडे तुरळक प्रमाणावरती आहेत. सागाचे उत्पन्न कमी भागात आहे. मोळचा तोडल्याने लोक जंगलाचे नुकसान करतात असा आक्षेप घेणाऱ्या जंगल-खात्याने गेल्या काही वर्षात किती रोपलावणी केली ह्याचा आढावा घेणे उद्‌बोधक ठरेल.

शेकडो लोक रोज उपाशी असताना काही पैसेवाले बेकायदा जमीन खंडत आहेत हे पाहून आपणही कायदेशीरपणे जमीन खंडावी ह्या इच्छेने पडीत जमीन लागवडीसाठी मिळण्याकरता लोकांनी अनेक अर्जफाटे केले. जर त्यांना उत्तर आलेच तर आम्ही जमीन वहिवाटीस देऊ शकत नाही ह्याबद्दल दिलगीर आहोत ' एवढेच उत्तर तोंडावर फेकले गेले. अनेक वर्षातील विनंती अर्जांला थकून शेवटी आपल्या मूलभूत मानवी हक्कासाठी लोकांना नाइलाजाने बेकायदेशीर अतिक्रमण करण्यास सुरुवार करावी लागली. गेल्या चार महिन्यामध्ये ह्या भागातील १० गावांतील वेगवेगळचा लोकांनी जंगलातील झाडेझुडुपे साफ करून जमीन वहिवाटीस आणण्याचे काम सुरू केले. सुमारे १०० एकर जमीन साफ केली. या जमिनीमध्ये नांगरणी करत असताना सुमारे १५० लोकांची धरपकड जंगल-खात्याने पोलीसांच्या मदतीने केली त्यांना १५-१५ दिवस तुरुंगवास भोगावा लागला. लोकांच्या ह्या उत्स्फूर्त अतिक्रमणामुळे जंगल-खात्याचा जनतेवरील दबाव कमी झाला आहे. त्यांच्या दंडेलशाहीला थोडा आळा बसला आहे. जंगल खात्याची सत्ता निमूटपणे सहन करणारी भूमिहीन जनता न्याय्य मागणीसाठी तुरुंगात जाण्यास तयार झाली आहे.

सर्व भूमिहीनांना जमीन मिळालीच पाहिजे. पण ही जमीन जर प्रत्येकास वाटायची ठरविली तर प्रत्येकाच्या वाटचाला खूप थोडी येईल व उत्पन्न वाढणार नाही. यासाठी सहकार्याने सामुदायिक शेती करण्यास हे लोक जरूर तयार होतील. समाजकार्य करणाऱ्या ग्रामस्वराज्य संस्थेसारख्या संस्था ह्या भागात असल्याने वरील कल्पना त्यांच्या सहकार्याने साकार होण्यास अडथळे येतीलसे वाटत नाही. ह्या १०,००० एकर जमिनीपैकी काही भाग

अशा तऱ्हेने लोकांना दिल्यामुळे उत्पादन वाढेल. लोकांच्या खावटीचा प्रश्न सुटेल. त्यांच्यामध्ये सहकार्याची भावना वाढेल, मोळ्या विकण्याचे थांबेल. बाकी जंगलाचे संरक्षण सुकर होईल. जंगलखात्याचा खरा उद्देश साध्य करता येईल. जमीनवाटपाबद्दल वरीलप्रमाणे मार्ग अवलंबिला नाही तर दुसरा एकच पर्याय उरतो आणि तो म्हणजे सरकारने तातडीने सर्व भूमिहीन मोळीविक्यांना कायमचा धंदा पुरवावा. अन्यथा गरिबी व जंगलाची पीछेहाट थांबणार नाही.

या भूमिकेमधूनच ग्रामस्वराज्य समितीच्या लोकांनी २ ऑक्टोबर १९७२ रोजी जंगल विभागातील नांदिया गावी एक सभा व सत्याग्रह आयोजित केला आहे. वेगवेगळ्या गावचे भूमिहीन लोक एकत्र जमून जंगलातील पडीत जमिनीत त्या दिवशी शिरतील आणि जमिनीची साफसफाई व नांगरणी करण्याचा प्रयत्न करतील. अशा जाहीरपणे केलेल्या अतिक्रमणाशिवाय झोपलेल्या सरकारला ह्या लोकांची गाऱ्हाणी कळणे शक्य नाही. जी गोष्ट अर्ज करून ध्यानी आली नाही ती सामुदायिकरीत्या कायदा मोडून ध्यानी आणून देणे हा उद्देश आहे. एका सत्याग्रहाने भागले नाही तर यापुढे कितीही वेळा व प्रत्येक वेळी वाढत्या संख्येने पडीत जमिनीसाठी झगडण्याची भूमिहीन जनतेची तयारी आहे. २ ऑक्टोबर ही सुरुवात आहे.

भूमिहीन श्रमिकांचा विजय असो !

ग्रामस्वराज्य समिती, शहादा

पुणे वार्ता

# क्रिकेट सामन्यात वाडियाची हुल्लडबाजी !

मुकुंद मणूरकर

गुरुवार दि. २८ सप्टेंबरला दुपारी पावणेबारा वाजता नेहरू स्टेडियमवर एक सनसनाटी घटना घडली. स. प. व वाडिया यांच्यातील आंतर-महाविद्यालयीन क्रिकेटच्या अंतिम सामन्यातील तो निर्णायक क्षण होता ! वाडियाला सामना जिंकण्यासाठी तीस-एक धावांची गरज होती तर स. प. ला दोन गडी बाद करावयाचे होते. स. प. च्या राजू भालेकरचा एक चेंडू फटकाविण्याच्या नादात वाडियाचा मतीन शेख पायचित झाला. त्याला हा निर्णय पसत नव्हता. त्याने निषेध म्हणून रागाने बॅट आपटली, पंचांना एक शिवी हासडली व तंबूचा रस्ता धरला. आणि हा इशाराच समजून वाडियाचे हितचिंतक पंचांना मारण्यासाठी मैदानात घुसले ! सामना बंद पडला !

पण हा सामना अचानकपणे बंद पाडला गेला का ?—तर याचे उत्तर 'नाही' असे येईल ! पंचांचा निर्णय हे एक निमित्त झाले ! खरे म्हणजे, वाडियापुढे पराभवाचे संकट आ वासून उभे होते. त्याला हुलकावणी देण्याचा केविलवाणा प्रयत्न करण्यासाठीच हा प्रकार जाणून बुजून करण्यात आला ! सुरुवातीपासूनच्या घटना पहिल्यास पूर्ण परिस्थितीची कल्पना येईल.

स. प. महाविद्यालयाचा क्रिकेट संघ गेली दोन वर्षे 'डेव्हिड करंडक' जिंकीत आला आहे. यंदाचाही त्यांचा संघ इतरांपेक्षा सरस व समतोल असा होता. यंदाही स. प. चा संघ अजिंक्यपद मिळविणार ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ होती ! पण क्रिकेटमध्ये भाकितांना काही अर्थ नसतो. सामन्याच्या पहिल्याच दिवशी वाडियाने स. प. च्या आत्मविश्वासाचा फुगा फोडला ! त्यांनी केवळ १६४ धावात स. प. ला गुंडाळले. इतकेच नव्हे तर स्वतः २६३ धावा करून स. प. वर ९९ धावांचे अधिक्यही मिळविले. यावेळी वाडियाच्या यजुवेदरसिंगने शानदार शतक झळकविले. दुसऱ्या डावातही स. प. ची फलंदाजी यथातथाच झाली. त्यांनी २३१ धावा केल्या. आता विजयासाठी वाडियाला १३३ धावा हव्या होत्या. तिसऱ्या दिवशीचा खेळ संपला तेव्हा वाडियाचा धावफलक होता ४ बाद ५४ ! म्हणजे विजय केवळ ७९ धावात दृष्टीपथात होता व सहा गडी खेळावयाचे होते ! त्यातही विशेष

म्हणजे पहिल्या डावातील शतकवीर यजुवेंदर हा नाबाद होता व त्यांचा दुसरा मोहरा रामेंदरसिंग अजून खेळायास यायचा होता ! म्हणजे सामना संपूर्णपणे वाडियाच्या खिशात होता. आणि म्हणूनच गुरुवारी सकाळी वाडियाचा तंबू अगदी फुलून गेला होता. विजयोत्सव साजरा करण्याच्या तयारीनेच ते आले होते. फटाके अॅटमबाँम्स, हार-गुलाल यांची जय्यत तयारी होती. हे वर्णन एवढ्याचसाठी केले, की त्यावेळी वाडियाच्या हितचिंतकांची मन:स्थिती कोणत्या प्रकारची होती हे कळावे !

खेळाला सुरुवात झाली आणि वाडियाला अनपेक्षित असे धक्के बसत गेले. यजुवेंदर पहिल्याच षट्कात बाद झाला. थोड्याच वेळात रामेंदरही बाद झाला. वाडियाचे प्रेक्षक आता अस्वस्थ होऊ लागले होते. एकीकडे त्यांचे एकेक मोहरे तंबूत परतत होते आणि दुसरीकडे स. प. च्या बलाढ्य संघाला हरवून 'डेव्हिड करंडक' जिंकण्याचे त्यांचे स्वप्न धुळीस मिळत होते ! संघाच्या १०० धावा झाल्या असताना, म्हणजे विजयासाठी अजून ३३ धावा हव्या असताना त्यांचा ९ वा गडी बाद झाला. हा गडी म्हणजे वर उल्लेखलेला मतीन शेख ! पंच श्री. रानडे यांनी त्याला पायचित ठरविले आणि त्याच वेळी पंचांना जाब विचारण्यासाठी शंभरएक जणांचा जथा मैदानात घुसला. पंचांशी थोडीफार झटापट करून हा जथा परत मैदानाबाहेर गेला. तंग वातावरणात खेळ सुरू झाला. पुढच्याच षट्कात स. प.च्या खेळाडूंनी शेवटच्या फलंदाजाविरुद्ध पायचितचे जोरदार अपिल केले, पण पंच श्री. लोखंडे यांनी ते फेटाळले. (वास्तविक हा खेळाडू बाद होता, पण केवळ दहशतीमुळेच लोखंडे यांनी त्याला बाद ठरविले नाही !) ते षट्क संपल्यावर काहीही कारण नसताना, वाडियाचे पाठीराखे परत एकदा 'वुई वॉन्ट जस्टीस'च्या आरोळ्या ठोकत मैदानात घुसले. इतका वेळ शांत असलेल्या स. प. च्या विद्यार्थ्यांनी आता मात्र आपल्या संघातील खेळाडूंच्या संरक्षणासाठी मैदानात धाव घेतली. इकडे वाडियाच्या विद्यार्थ्यांनी पंचांना रेटत रेटत व शिव्यांची लाखोली वहात मैदानाच्या दुसऱ्या टोकाला नेले. त्यांच्या तावडीतून पंचांना कसेबसे सोडवून महाराष्ट्र असोसिएशनच्या इमारतीत नेण्यात आले. दरम्यान वाडियाच्या विद्यार्थ्यांनी खेळपट्टीवर नाचून ती उद्ध्वस्त करून टाकली. स्टंप्स् उखडून टाकण्यात आले. इतकेच नव्हे तर एम्. सी. ए., नेहरू स्टेडियम या इमारतींच्या काचांवर दगडफेक करण्यात आली, पॅव्हेलियनमधील खुर्च्यांचीही उधळण करण्यात आली ! यावेळी मैदानावर फक्त चार-पाच पोलीस उपस्थित होते. पण त्यांना घोळात घेऊन, त्यांच्या टोप्या वगैरे उडवून त्यांचा अक्षरश: 'मामा' करण्यात आला ! थोड्या वेळाने पोलिसांची आणखी कुमक येऊन परिस्थिती

[ पृष्ठ ६३ वर ]

## सांस्कृतिक मुंबई

# दिसला ग बाई दिसला !

विनय धुमाळे

नाथ Follow him up हां ! हां ! जाने दो स्ट्रेट यस पॅन लेफ्ट लिट्ल विट. गिव्ह मी मीडिअम क्लोज अप यस यस वी रेडी स्टेडी आय ॲम गोइंग टू टेक यू टेक टू. (२) वाहवा ! नाथ क्या शॉट दिया तूने ? काँग्रॅट्स ! मेंहदळे भरल्या आवाजात कमांड्स देत होते. डोळे पाण्याने भरलेले. आवाज चोक अप् झालेला आणि अशा अवस्थेत विश्वास मेंहदळे 'वाहातो ही दुर्वांची जुडीचे' शूटींग घेत होते. पण हे सारं चाललंय काय ? थोडं थांबा थांबा सगळं सांगतो. विश्वास मेंहदळ्यांचे डोळे पाणावले कशामुळे ? मुंबईत वरळीकडे जाणाऱ्या सगळ्या बसेस फुल्ल का ? आणि आय. एस. जोहरला घाम का फुटला या तिन्ही प्रश्नांची उत्तरे विरवलने सांगितल्याप्रमाणे एकच— 'टेलेव्हिजन' उर्फ 'दूरचित्रवाणी' आणि वरचा संवाद पण तेथलाच.

सध्या मुंबईत एकच विषय टी. व्ही. ! पेपरात याविषयक भल्या मोठ्या पुरवण्या येत आहेत. ज्या काही लोकांचे नातेवाईक टी. व्ही. वर कामाला आहेत ते 'टी. व्ही. स्टुडिओ बघणे म्हणजे सहल समजून खाण्याचे सामान, पाण्याच्या बाटल्या वगैरे घेऊन (नशीब ढोलकी बिलकी आणत नाहीत) लेकी, सुना, मित्र, मैत्रीणीसह वरळीच्या दिशेने धाव घेत आहेत. त्यामुळे साहजिकच वरळीकडे जाणाऱ्या सर्व बसेस फुल आहेत. पण ही विश्वास मेंहदळे वगैरे भानगड काय आहे ?

त्याचं असं झालं वाहातो ही दुर्वांची जुडी हे टी. व्ही. वरून दाखवणार आहेत आणि त्याचं टी. व्ही. शूटींग केलंय विश्वास मेंहदळ्यांनी (विश्वास मेंहदळे आपल्याला बातम्या देत आहेत फेम ! आता कसा त्यांच्या पर्सनॅलिटीला ग्लॅमर आल्यासारखा वाटतो) आणि जुडीतला तो प्रसिद्ध

सीन. ताईचं लग्न झाले आहे आणि ताई (आ. का.) सुभाषच्या (बा. को.) पाया पडायला येत आहे आणि ती पायाँ पडायला आली आणि इथे मेहंदळयांच्या प्रेक्षक आणि प्रोडयुसर या डबल रोलला सुरुवात झाली. एकीकडे प्रेक्षक या नात्याने त्यांच्या डोळयांतून अश्रू वाहात होते तर प्रोडयुसर या नात्याने फटाफट कमांडस देत होते. पण बाळ कोल्हटकरांना असा काही तो सीन केला की तिथे जमलेल्या सर्वच लोकांच्या डोळयात पाणी आले. आपण तर साधी माणसं. पण नाटकात वगैरे नेहमी काम करणाऱ्या भक्ती बर्वेंच्याही. त्याही चक्क रडत होत्या. क्षणाक्षणाला रूमाल बाहेर काढत होत्या आणि मी त्यांच्याकडे बघितलं की परत हसत होत्या. अशी एकंदर गंमत चालली होती.

हे टी. व्ही. चे शूटींग चालते तरी कसे ? थोडं थांबा. सारं काही सांगतो. (हो आताच. नाही तर परत कोण आम्हाला भाव देणार आहे.)

एक मोठ्ठा स्टुडिओ त्यात ३ कॅमेरे चाकावरचे त्यात ज़वळ जवळ १२० ते १४० भले मोठे दिवे. अनेक ठिकाणी माईकस् अडकवण्याची सोय. आणि सारं कसं थंडगार. असं चित्र डोळयासमोर आणा की झाला स्टुडिओ. या स्टुडिओत काय वाटेल तो सेट मांडता येतो. एका रात्रीत राजवाड्याचा गरीबखाना करता येतो. आणि सध्या तसं चाललंही आहे. बाजूलाच सेट डिपार्टमेंट. आपल्या कार्यक्रमाला योग्य असा सेट करण्याची कल्पना प्रोडयुसर देतात आणि सेट डेपामधले वीर एका रात्रीत सेट तयार करतात. मग तो समुद्रकिनारा आणि नारळीची झाडी असो की पंजाबमधले खेडे असो.

तर असा हा स्टुडिओ. त्यात चाकावर हालणारे ३ कॅमेरे असतात. (आपोआप नाही कॅमेरामनने हलवल्यावर) त्या कॅमेरामनला प्रत्येकाला एक हेडफोन आणि माईक (पायलट लोकांसारखा) दिलेला असतो. वरती कंट्रोल पॅनल नावाची खोली असते. तेथे प्रोडयुसर आणि त्यांचे सहाय्यक बसलेले असतात. त्यांच्यासमोर सहा टी. व्ही. सारखे स्क्रीन असतात आणि त्यावरून त्यांना तीन कॅमेऱ्यावरील दृश्य दिसते व ते बघूनच व त्याप्रमाणे कॅमेरामनना सूचना देऊन त्या तिन्हीमधील सर्वोत्कृष्ट चित्र ते निवडतात व लगेच बाजूच्या माणसाला सांगतात– टेक टू– म्हणजे कॅमेरा २ चे चित्र घ्या. आणि अशाप्रकारे रेकॉर्डिंग चालते.

पुण्याला टी. व्ही. चालू व्हायला अजून बराच वेळ आहे. साधारण वर्ष तरी लागेल. सिंहगडावरचा प्रक्षेपण मनोरा पुरा झाला की पुण्याच्या लोकांना पण टी. व्ही. दिसायला लागेल. पण त्याआधी मुंबईच्या लोकांची गंमत सांगतो. ज्यांच्याकडे २५०० रु. वगैरे खर्च करून टी. व्ही. घेतला आहे त्यांचे पूर्वी दररोज टी. व्ही. सेंटरला फोन. दिवसाकाठी साधारण २०० ते ३०० फोन्स आणि प्रश्न एकच–आज टेस्ट ट्रान्समिशन आहे का ? आणि काल

किती वाजता होतं. एकाला मी सांगितले, की बिटवीन वन टू फाइव्ह तर त्या बेटचाच्या सेटवरती आदल्या दिवशी दुपारी प्रोग्रॅम दिसला नव्हता वाटतं. तर लगेच त्यानं विचारलं, वन टू फाइव्ह खरं पण सकाळी की संध्याकाळी? बोला! जनता इतकी उतावीळ झाली आहे की विचारू नका! सध्या तरी टी. व्ही. सेट्सची किंमत इतकी महाग आहे, की आपल्यासारख्यांना परवडणं शक्यच नाही. असंच रस्त्यावरून कुठल्या तरी दुकानातल्या सेटवर बघायचं.

मुंबई टी. व्ही. चे आणखी एक आकर्षण म्हणजे त्याचे डायरेक्टर श्री. पी. व्ही. कृष्णमूर्ती. सरकारी खात्यात एवढा तल्लखपणा क्वचितच. अतिशय मनमिळाऊ आणि विनोदी व कल्पक गृहस्थ. या माणसाची कल्पना कशी धाव घेईल काही सांगता येत नाही. आम्ही त्याला विचारले, की तुमचा एक फोटो द्या. तर त्याने झटकन हसत विचारले, कशाला ऑबिच्युरी करता? तर असा हा दिलखुलास गृहस्थ. सध्या तरी म्हणतोय की Here Ideas will rule. अगदी आत्मविश्वासाने. बघू पुढे काय होतंय ते. पण सध्यातरी हा गृहस्थ फॉर्ममधे आहे. शेवटपर्यंत मुंबई टी. व्ही. वर डायरेक्टर बदलले तरी Let ideas rule ही एकच इच्छा.

हे झाले टी. व्ही. केंद्रावरचे वातावरण. बाहेर तर आणि ज्यांच्याकडे टी. व्ही. सेट घेतला आहे त्यांच्याकडे तर विचारायलाच नको. गणपती जसा मखरात बसवतात तसा टी. व्ही. ला अगदी मखरात बसवलंय यांत्रिकांनी. (पुढील वर्षी विसर्जन न करोत म्हणजे झालं.) त्यामुळे परवा दोन तारखेला अनेक निमंत्रितांच्या (प्रत्येक घरी) समक्ष जेव्हा प्रोग्रॅम दिसला तेव्हा सगळ्यांना एकच आनंद झाला व धास्ती मिटली व समस्त मंडळींनी एकच गाणे म्हटले असेल 'दिसला ग बाई दिसला.'

□ □ □

प्रसिद्ध झाले

# एका पराभवाची कहाणी

लेखक :
ब्रिगेडियर जे. पी. दळवी

अनुवाद :
अनंत भावे

# आलेपाक

■ काँग्रेसचा क्रियाशील कार्यकर्ता होण्यासाठी खादी वापरण्याची अट बंधनकारक असू नये, असे काँग्रेसचे सरचिटणीस श्री. चंद्रजित यादव म्हणतात.

खादी वापरणाऱ्यांची क्रियाशीलता मंदावते, हे आम्हाला गेल्या पंचवीस वर्षांच्या अनुभवाने चांगले कळलेले आहे. श्री. चंद्रजित यादवांना, उशिरा का होईना, ते कळले हे बरे झाले.

■ मुंबई शहराचे सौंदर्य अधिक वाढवण्यासाठी दर वर्षी एक याप्रमाणे दहा पोहोण्याचे तलाव बांधण्याची योजना आखण्यात आली आहे.

या तलावात गंगा-कावेरी कालव्याचे पाणी सोडण्यात यावे, अशी जाहीर सूचना आम्ही येथे करतो. तिचा गांभीर्याने विचार व्हावा.

■ 'अकुलिना' नाटकावरील एका परीक्षणात म्हटले आहे, 'अकुलिना' हे नाटककार पु. भा. भावे यांच्या लेखणीला पडलेले तरल नि सुंदर स्वप्नच !

हे नाटक पाहताना आम्हाला बऱ्यापैकी झोप लागली ती यामुळे तर ?

■ 'प्रत्येक युद्धानंतर भाववाढ होते; ही काही भारतातच घडणारी मुलखावेगळी गोष्ट नाही,' असे इंदिरा गांधी म्हणाल्या.

असे म्हणून भाववाढीचे सज्जड समर्थन करणे ही मात्र भारतातच घडणारी गोष्ट आहे.

■ "टीकाकारांना उत्तर द्यायला बसलो तर मी नाटके लिहू शकणार नाही." असे श्री. विजय तेंडूलकर म्हणतात.

असे बोलणे नाटककाराच्या जातीला शोभत नाही हो. शिवाय तेंडुलकर महोदय आपल्या टीकाकारांना मधून मधून जी उत्तरे देतात ती त्यांच्या नाटकाइतकी नाट्यपूर्ण तरी खचितच असतात.

■ टास वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले आहे की मंगोलियात यान्ह पर्वताच्या आसपास तीन लक्ष वर्षापूर्वीचे एक प्राचीन वर्कशॉप सापडले आहे.

या ठिकाणी संप, नियमाप्रमाणे काम, टाळेबंदी, बोनस वगैरे गोष्टींची व्यवस्था कशी काय होती हे कोणी आम्हाला सांगेल काय ?

■ 'श्यामची आई' ही कै. साने गुरुजींची कादंबरी नाट्यरूपाने रंगभूमीवर आणण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्रने कर्ज दिले आहे.

धडपडणाऱ्या मुलांची आई होण्याचा प्रयत्न करणाऱ्या या बँकेला आमच्या सदिच्छा.

■ 'माणूस 'मधील 'पुणे वार्ता 'पत्रात म्हटले, आहे बाकी पुण्यात जसा गणपती गाजतो तसा इतरत्र गाजत नाही हे नक्की ! आणि का गाजत नाही हेही समजत नाही.

त्या मूषकवाहन, गजमुख, मंगलमूर्ती गणपतीलाच उद्देशून हा मजकूर लिहिला आहे, असे आम्ही मानतो.

■ वरील वार्तापत्रात पुढे असे म्हटले होते एका मंडळाने तर गणेशमूर्तीला राजेश खन्नाच्या स्वरुपात अवतरविले होते.

हा गणपती नवसाला पावतो, असे मला कोणीतरी सांगत होते.

■ 'लेखिकांची संख्या दिवसेंदिवस फुगत आहे' असे एका लेखिकेने 'ललित 'च्या ताज्या अंकात म्हटले आहे.

— नुसत्या संख्येचे काय घेऊन बसलात ? खुद्द लेखिकासुद्धा दिवसेंदिवस फुगत आहेत. उदाहरणार्थ: XX XXXX, XXX XXX, XXXX XXXX. (फुल्यांच्या जागी योग्य ती नावे आपली आपण घालावी. मात्र हे 'माणूस 'चे आणखी एक कोडे आहे, असे मानू नये. नावे उघड लिहिण्याची माझी हिंमत नसल्यामुळे तुमची मदत मागितली.)

■ लोकप्रिय नाटककार श्री. सुरेश खरे यांनी म्हटले आहे : 'तसा मी थोडासा नशीबवान आहे. उत्तम दिग्दर्शक, उत्कृष्ट नटसंच आणि भक्कम निर्माता यांच्या खांद्यावर मी उभा आहे.'

— वा, राव. रसिक प्रेक्षकांचा चौथा खांदा विसरणे बरे नव्हे. कारण उभ्याचा आडवा करणारा खांदा आहे ना तो !

■ "समाजाप्रमाणे साहित्यातही गट असतात" असे मत 'माता द्रौपदी '-कार विद्याधर पुंडलिकांनी व्यक्त केले आहे.

— खरं आहे. रोगट साहित्य, चेंगट साहित्य, लागट साहित्य, घुंगट साहित्य, पेंगट साहित्य, झेंगट साहित्य, शेंगट साहित्य असे साहित्याचे गट पडणार. पडणार नाहीत काय ?

■ महिला मासिकांचा तोंडावळा हा इतर मासिकांपेक्षा वेगळा असतो, म्हणे.

— छे छे. सगळ्या मासिकांचा तोंडावळा महिलांचाच असतो, असा आमचा प्रत्यक्ष अनुभव आहे.

एक वार्ता: 'त्याला नुकती पंचवीस वर्षे पुरी झाली. हल्लीच त्याने लग्न केले. 'स्वातंत्र्याची पंचवीस वर्षे' या नावाने त्याच्या आत्मचरित्राचा पहिला खंड आता प्रसिद्ध होणार आहे' ◻

## मेली पुरुषांची जात

पश्चिम गोलार्धातील स्त्रिया पुरुष-वर्चस्वासून मुक्त होण्याचा प्रयत्न गेली कित्येक वर्षे करत आहेत. अलीकडे या प्रयत्नाला विशेष धार चढली आहे.

पुरुषवर्चस्वाची सगळी चिन्हे, प्रतीके मोडूनतोडून फेकून देण्याची मोहिम या पाश्चात्य मुक्ताबाईंनी उघडली आहे. त्याचे एक गंमतीदार उदाहरण सांगतो: चेअरमन (म्हणजे अध्यक्ष) हा तुम्हा-आम्हाला सगळ्यांना माहीत आहे; या Chairman शब्दात काही आक्षेपार्ह आहे असे तुम्हाआम्हाला वाटत नाही. परंतु पाश्चात्य मुक्ताबाईंना मात्र, नव्या जाणीवेमुळे, त्या शब्दातील पुरुषवर्चस्व-दर्शक 'man' हे पद आक्षेपार्ह वाटते. त्यामुळे त्यांनी Chairman ला Chair-person असा उभयान्वयी शब्द सुचवला आहे. नुसता सुचवला नाही; त्यांनी त्या शब्दाचा उपयोग हिररीने करायला प्रारंभ केला आहे.

ही प्रक्रिया इथेच थांबेल असे थोडेच आहे? फायरमन, पोलिसमन, मिल्कमन यांना फायरपर्सन, पोलिसपर्सन, मिल्कपर्सन असे संबोधले जाईल; पोस्टमनचा पोस्टपर्सन होईल; manager हा शब्द Personager असा लिहिला जाईल. 'अ मॅन फॉर ऑल सीझन्स,' 'डेथ ऑफ अ सेल्समन' या नाटकांची नावे 'अ पर्सन फॉर ऑल सीझन्स,' 'डेथ ऑफ अ सेल्सपर्सन' अशी बदलावी लागतील; इतकेच नव्हे तर मॅन्चेस्टरला पर्सनचेस्टर आणि जर्मनीला जर्पर्सनी अशी नवी नावे देण्याची मागणी केली जाईल.

आपल्या येथे अशी काही चळवळ झाल्यास भाषेत फार उलजापालथ होईल असे मानण्याचे विलकुल कारण नाही. 'पुरुषांच्या जाती'ला धक्का लावायची आमच्या स्त्रियांना गरजच नाही तिला खास बायकी पद्धतीने 'मेली' म्हटले म्हणजे सगळे काम भागते, अशी त्यांची समजूत आहे. ◻

## मैत्री आंधळी असते

मायकेल अँजेलो अँटोनिओनी नावाचा एक ख्यातनाम इटालियन चित्रपट दिग्दर्शक आहे. त्याच्या नव्या चित्रपटाचे नाव आहे 'झाब्रिस्की पॉईंट' या चित्रपटावर ब्राझीलने बंदी घातली आहे.—?—कारण चित्रपट अमेरिकेची बदनामी करणारा आहे, असे ब्राझीलला वाटते आणि अमेरिकेची बदनामी ब्राझील कशी खपवून घेणार? कारण ब्राझील आणि अमेरिका ही मित्रराष्ट्रे आहेत.

गंमतीची गोष्ट अशी की 'झाब्रिस्की पॉईंट' या चित्रपटावर खुद्द अमेरिकेने मात्र बंदी घातलेली नाही!

—अनंतराव

# स्वातंत्र्य सैनिकांचा नांदेड येथील मेळावा

देवदत्त तुंगार

स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे झाल्या-नंतर स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जे हुतात्मे झाले त्यांच्या कुटुंबियाकडे, ज्यांनी देहदंड सोसला कारावास भोगला, भूमिगत राहून लढ्याला मदत केली त्यांच्या (सुख)दुःखाकडे, समस्या-कडे सरकारचे व समाजाचे विशेषत्वाने लक्ष वेधले जात आहे ही स्वागतार्ह बाब आहे. या गोष्टीकडे पूर्वीच लक्ष देणे अधिक प्रसंगोचित झाले असते. उशीरा का होईना कृतज्ञता बुद्धी जागृत झाली हेही नसे थोडके! कृतज्ञताबुद्धी दाखविताताही सहा महिने कारावास भोगलेले, सहा महिन्यापेक्षा कमी कारा-वास भोगलेले, कारावास न भोगलेले, भूमिगत राहून कार्य केलेले अशी चातुर्वर्ण्याधिष्ठित वर्गवारी सरकारने केली आहे. समाजातील विविध संस्थातर्फे करण्यात येणाऱ्या सत्कार समारंभातही आपले, दुसरे, या जिल्ह्यातले, या गटातले, त्या गटातले, असा विचार स्वातंत्र्य सैनिकांबाबत होत असतोच. स्वातंत्र्योत्तर काळात जातीयतेच्या विरुद्ध तोंडी युद्धघोष चालू असला तरी जातीयता आणि वर्णीय दृष्टी यांची समाजजीवनावरील पकड अधिकच घट्ट होत असल्याने लढ्याच्या काळात खांद्याला खांदा भिडवून प्राणार्पणास सिद्ध असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार करतानाही जातीय व वर्णीय दृष्टीचा वरचष्मा दुर्दैवानेच आढळतोच. स्वातंत्र्य सैनि-कांच्या सत्कार समारंभात असे दोष असूनही, स्वातंत्र्यलढ्याच्या देदीप्यमान तेजस्वी पर्वाची उजळणी होते, नव तरुणांना स्फूर्ती मिळते व विस्मृत होऊ पहाणारा ऐतिहासिक पैलू अधिकच उजळून निघतो हा एक मोठाच लाभ म्हटला पाहिजे.

या दृष्टीने नांदेड एज्युकेशन सोसाय-टीच्या सायन्स कॉलेजने हैदराबाद मुक्ती संग्राम सैनिकांचे दोन दिवसांचे जे शिबिर नुकतेच आयोजित केले ते स्वागतार्ह होते. शिबिरात हैदराबाद मुक्ती लढ्यांचे अनेक नेते व छोटे मोठे कार्यकर्ते उपस्थित होते. औपचारिक भाषणाप्रमाणेच अनौपचारिक चर्चा परिसंवाद व मुक्त चिंतन यामुळे दोन दिवसांचे शिबिर म्हणजे एक 'कौटुंबिक' मेळावाच झाला. सदर शिक्षण संस्था पूज्य स्वामी रामानंदतीर्थ यांनी स्थापन केलेली असल्याने तिने असे शिबिर आयोजित करणे औचित्यपूर्णच म्हटले पाहिजे. □

## स्वामीजींचे कर्तृत्व

शिबिराचे उद्घाटन हैदराबाद राज्याचे माजी गृहमंत्री व थोर स्वातंत्र्य

सेनानी श्री. दिगंबरराव बिंदू यांनी केले. (बिंदूचे कार्य 'तेच आव्हान तीच माती' ग्रंथाद्वारे गोळेगांवकर यांनी लेखबद्ध केलेले जाणकारांना माहीतच आहे.) श्री. बिंदू यांनी स्वामी रामानंद-तीर्थ यांचे कार्य व कर्तृत्व अगदी मोजक्या शब्दांत समर्थपणे विशद केले. ते म्हणाले, की भारताच्या इतिहासात महात्मा गांधींना जे स्थान आहे तेच स्थान हैदराबाद मुक्ती संग्रामात पूज्य स्वामीजींना आहे. स्वामीजींचे नेतृत्व मुक्ती आंदोलनाला लाभले नसते तर हैदराबादचा व पर्यायाने भारताचा इतिहास वेगळा (अनिच्छित) घडला असता. जात्यंध मुस्लीमांची स्वार्थी उठावणी (स्वातंत्र्यविरोधी) व संस्था-निकांची सरंजामशाही हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीपुढे दोन मोठे अडथळे होते. हैदराबाद राज्यात या दोन्ही आघाडीवर प्रकर्षाने लढावे लागले.

शिबिराचे अध्यक्ष श्री. गोविंदभाई श्रॉफ यांनी स्वातंत्र्योत्तर जन्मलेली पिढी यांनी एकत्र यावे या हेतूने शिबिर आयोजित करण्यात आले असे प्रति-पादन केले. कर्मयोगी बाबासाहेब परां-जपे यांनी स्वातंत्र्यलढा पाण्यातील बर्फ-शिलेप्रमाणे असतो. बर्फाचा बराच भाग पाण्याखाली असतो. वरचा भाग प्राति-निधिक असतो. या स्वरूपातच हा सत्कार आम्ही स्वीकारीत आहोत असे सांगितले. लढ्याचे विश्लेषण करताना माजी हैदराबाद राज्यातील जनतेने भारतीय जनतेपासून अलग राहू नये म्हणून प्राणपणाने आम्ही लढा लढलो व संस्थानिकांची स्वतंत्र राज्ये स्थापून भारताच्या चिंध्या करण्याचा इंग्रजांचा हेतू हाणून पाडला असे त्यांनी प्रतिपादन केले. □

## श्री. साहेबराव बारडकर व उमरी बँक ऑपरेशन—

नांदेड जिल्ह्यातील एक धडाडीचे स्वातंत्र्य सैनिक श्री. साहेबराव देशमुख बारडकर यांचे मंत्रमुग्ध करणारे भाषण म्हणजे या शिबिराचे एक उल्लेखनीय वैशिष्टय म्हणावे लागेल. हैदराबाद मुक्ती लढा दिवसेंदिवस तीव्र होवू लागला. पण आर्थिक पाठबळ कमी पडू लागले. स्वातंत्र्य सैनिकांच्या नाड्याच एक प्रकारे आवळल्या जाऊ लागल्या. आर्थिक कोंडी फोडून स्वातंत्र्य लढा सुरळित चालावा या उदात्त हेतूने नांदेड जिल्ह्यातील उमरी येथील बँक लुट-ल्याची एक धाडसी योजना तयार करण्यात आली व तिची यशस्वी अंमल बजावणीही झाली. उमरी बँक ऑपरे-शनमधील श्री. साहेबराव हे विनीचे सैनिक त्यांच्या तोंडूनच तो रोम हर्षक वृत्तांत ऐकण्याची मौज काही औरच-सदर शिबिराच्या आधीही कलामंदिरांत त्यांनी अगदी समरहून उमरी बँक लूटीचा इतिहास चविष्टपणे निवेदन केला होता. उमरी बँक प्रकरणांच्या वेळी साहेबराव अवघे १९ वर्षाचे तरुण होते. आशीर्वाद देताना स्वामी रामानंद-तीर्थ यांनी 'ये नव्हे छोटे बच्चे दुबार

मुझे नजर नही आएंगे ' असा भावपूर्ण निरोप दिला! उमरी बँकवरील हल्ल्याची योजना व ती पार पाडताना आलेली विघ्ने यांची रोचक भाषाशैलीत साहेबराव यांनी माहिती दिली. उपस्थित श्रोतृसमुदाय टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना सारखा प्रतिसाद देत होता. बँक अधिकाऱ्यांचा खून करून खजिना हस्तगत केल्यावर उमरी येथील नागरीकांनी फुले उधळून स्वातंत्र्यवीरांना सीमेपार जाताना उत्साहाने निरोप दिला.

नांदेड जिल्ह्यातील इस्लापूर पोलीस स्टेशनवर मुक्ती सैनिकांनी शस्त्रात्रे प्राप्त करण्यासाठी जो अशस्वी हल्ला केला, त्याचीही माहिती साहेबरावांनी दिली. थोड्याशा चुकीमुळे हल्ला यशस्वी होऊ शकला नाही. हल्ल्यात कामास आलेल्या सहकाऱ्यांचे पुण्य स्मरण करून "सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते" या कुसुमाग्रज कृत पंक्ति साहेबरावांनी म्हटल्या तेव्हा श्रोतृसमुदायात स्वातंत्र्य लढ्यातील अग्निमय वीज चमकून गेल्यासारखे वाटले! उमरी बँक ऑपरेशन, इस्लापूर पोलीस ठाण्यावरील हल्ला व स्वातंत्र्य लढ्यातील हे असे प्रसंग म्हणजे कादंबरी नव्हे, वस्तुस्थिती आहे असे आवर्जून त्यांनी सांगितले. कल्पितापेक्षाही अद्भुत असलेली वस्तुस्थिती शब्दांकित करण्याचा जेवढा प्रयत्न व्हायला हवा तेवढा दुर्दैवाने होत नाही. □

## महिलांचे स्वातंत्र्यलढ्यातील कार्य

सौ. गीताबाई चारठाणकर यांनी लढ्यातील स्मृती सांगताना शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्यापासून स्वातंत्र्य सैनिकांना स्वयंपाक करून जेवू घालीपर्यंत काही महिलांनी स्वातंत्र्य लढ्याला कशी मदत केली याचे रसभरित वर्णन करून विशेष प्रसंग ओढवल्यास विष प्राशनाची तयारी ठेवून जखमी वीरांना सांभाळण्याचे कार्य त्यांनी कसे केले, मनमाड येथे अटक कशी झाली, लढ्याच्या समाप्तीनंतर खटला कसा चालला याची माहिती दिली.

शिबिरात इतरांनी केलेली भाषणे, स्वातंत्र्यानंतरची क्षितिजे:–आर्थिक सामाजिक शैक्षणिक प्रश्न यासंबंधी झालेले विचार मंथन ही शिबिराची फलश्रुती.

सर्वश्री पुरूषोत्तमराव चपळगांवकर, चंद्रगुप्त चौधरी, रघुनाथराव रांजणीकर, नागनाथराव परांजपे, कुलगुरू श्रीनाथ, नरहर कुरूंदकर, भाऊसाहेब वैशंपायन आदींची उपस्थिती उल्लेखनीय होती.

शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राचार्य केशवन, सौ. डॉ. प्रा. उषा देशपांडे, सौ. प्रा. ताराबाई परांजपे, श्री. व सौ. गांजवे आदींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बरीच मेहनत घेतली त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन केले पाहिजे.

□ □ □



छोट्या नायकाला प्रेरणा देणारी साठे माल्टेक्स बिस्किटे
SATHE Maltex BISCUITS
पहिल्या पासूनच मी लढाऊ वृत्तीचा.
लुटुपुटीची बंदूक घेऊन फिरण्याची व खेळण्या
मारी हौस. मध्येच भूक लागली तर खायला
माल्टेक्स बिस्किटे! माल्टेक्स बिस्किटे माझी
तब्येत ही अशी तुस्त राखतात. कारण त्याती
माल्ट व पौष्टिक घटक पूर्णपणे उत्साह
वाढविणारी आहेत.
SBC

# एक परिसंवाद

# दलित....समस्या अन्याय....विमुक्ती ....मार्ग वगैरे वगैरे

भा. ग. जोशी

पुणे विद्यापीठातील खेर वाङ्मय भवनात 'पदव्युत्तर विद्यार्थी कल्याण समिती' असा सर्वोदयी नावाच्या मंडळातर्फे २५ सप्टेंबरला 'दलितांच्या विमुक्तीची समस्या' या प्रश्नावर परिसंवाद भरवला होता. (पदव्युत्तर वि. क. स. ने हा परिसंवाद ठेवण्याचं प्रयोजन कळत नाही. पण हल्ली तालिममंडळापासून बार असोसिएशन पर्यंत सर्वांमधे दलितांसंबंधी नुसते परिसंवाद भरवण्याचीच पद्धत आहे.)

युनिव्हर्सिटीकडे जायला निघालो. वर्गात जसा एखादा एकलकोंडा आणि घुम्या मुलगा असतो त्याप्रमाणे पुणे विद्यापीठ शहरापासून दूर, एका बाजूला बसलंय्. एकदा आत शिरलं की, आपण पुण्यात आहोत याची पुसटशीसुद्धा आठवण राहात नाही, इतका वेगळा परिसर आणि इतकं वेगळं वातावरण. प्रचंड विस्तार–गर्द झाडी. वर्गापेक्षा कट्ट्यावरच प्रचंड बहुसंख्येने आढळणारी कॉलेजातील पोरपोरी पाहायला सरावलेली नजर येथे उराशी वह्या कवटाळून वावरणारा (भटकणारा म्हणत नाही, ते युनिव्हर्सिटीच्या 'पोझिशन'ला धरून होणार नाही!) तुरळक महिला वर्ग पाहून गोंधळून गेलो. मेन बिल्डिंगवर डौलाने फडफडणारा झेंडा (झेंडा नेहमी डौलात फडफडावा लागतो — नाहीतर लेख साभार परत यायचा)पाहून चुकून राजभवनात वगैरे तर आलो नाही ना असा संशय आला. मेनगेटपाशीच एक नकाशा लावलेला–हा नकाशा वाचून पुणे विद्यापीठात हवे ते ठिकाण शोधून काढणारा त्या लखनौच्या भुलभुलैयातून सहज बाहेर पडेल. खेर वाङ्मय भवनाच्या स्टॉपपाशी उतरुनसुद्धा मी अर्धा तास वणवण केली. शेवटी हताश होत एकाला रस्ता विचारला. गृहस्थ सूट वगैरे घातलेला होता त्याअर्थी "डॉ" वगैरे असावा असा नम्र कयास आहे.

"आपलं ते खेर वाङ्मय भवन कुठेशी आलं हो ?" मी घरगुती स्वरूप

आणण्याचा प्रयत्न केला.

"Pardon me"–Pardon चा उच्चार मातृभाषा मराठी असल्याची ग्वाही देत होता. मायबोलीतून बोललं तर आसपासची झाडी उन्मळून पडेल अशी भीती या लोकांना वाटते की काय कोण जाणे. येथे मी 'मातृभाषा आणि बदलत्या काळाची गरज' वगैरे पटवून द्यायच्या विचारात होतो पण सरकत्या वेळेची गरज लक्षात घेऊन विचार बदलला. इंग्लिशमधे ठणकावून सवाल टाकला; (समजतो कोण लेकाचा स्वत:ला) आणि त्याने मला बोट धरून न्यायचंच बाकी ठेवलं. घामाघूम होत इष्ट स्थळी पोचलो तेव्हाच चार वाजले होते. मला वाटलं विद्यापीठाचं सगळंच वेगळं–तेव्हा कार्यक्रमसुद्धा वेळेवर सुरू झाला असेल. पण ह्या बाबतीत मात्र विद्यापीठाने मराठी परंपरा निष्ठेने पाळली आहे, हे पाहून समाधान वाटलं. ४-२० पर्यंत सर्वजण सिनेमाचा आधीचा 'शो' सुटायची वाट पाहत रेंगाळतात तसे अधीर होऊन 'टाईमपास' करत होते. प्राध्यापकलोकांपुढे 'वट'मधे सिगारेट ओढत काहीजण पोस्ट-ग्रॅज्युएटस्टुडंट असल्याचं सिद्ध करत होते. अनेक रंग वापरून केलेलं पोस्टर टांगलं होतं. दलितांच्या समस्येवरती परिसंवाद ठेवला येतो हे काही पटत नव्हतं. परिसंवादाची माझी कल्पना– (कदाचित् प्रतिगामी असेल) दोन बाजू असलेल्या एखाद्या विषयावर विषय सोडून केलेली शाब्दिक धुमश्चक्री अशी होती. त्यामुळे प्रा. रा. म. बापटांना शंका विचारली. पण वर्गाबाहेर Difficulty सांगण्याची सवय कोणत्याच प्राध्यापकांना नसल्याने काहीतरी गोलमाल उत्तर मिळालं. तेवढ्यात कोणीतरी दुसऱ्याच विषयावर बोलू लागल्याने त्यांचासुद्धा नाइलाज झाला!

शंकरराव खरात वगळता इतर वक्त्यांचा "पत्त्याच" नव्हता–शेवटी कंटाळून परिसंवादाला सुरुवात झाली. आयत्यावेळी ग. वा. बेहऱ्यांना पकडण्यात आलं. लाउडस्पीकरवाल्यांचा माणूससुद्धा आला नव्हता. तेव्हा इतर आ. मंडळींना दोष देण्यात काही अर्थ नाही. प्रा. बापटांनी तशीच सुरुवात केली. सर्वांची उशीर झाल्याबद्दल व गैरशिस्तीबद्दल क्षमा मागितली आणि प्रा. शिरसीकरांना अध्यक्षपद स्वीकारण्याची नम्र विनंती केली. लगेच 'पदव्युत्तर विद्यार्थी कल्याण समितीचे' चिटणीस श्री. मोहन रानडे उठले आणि त्यांनी या विनंतीला अनुमोदन देऊन हाताला हात लावला.

इतक्यात प्रमुख पाहुण्यांच्या थाटात लाऊडस्पीकरवाले आले. परत रा. म. बापट उठले आणि त्यांनी या समितीचे ४ कार्यक्रम सांगितले–१) पुण्यातील विचारवंतांकडून (पत्रक काढणारे नाही बरं का) हा प्रश्न समजावून घेणे. त्यासाठीच हा परिसंवाद आहे. २) पुण्यातील विविध युवक-संघटनांच्या प्रतिनिधींमधे असाच परिसंवाद ३) खास पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी अजून एक दणकेबाज परिसंवाद ४) विद्यार्थ्यांसाठी या विषयावर एक निबंधस्पर्धा. (भरघोस बक्षिसे जिंका!)

इतका भरगच्च आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रम पाहून धन्य वाटलं. प्रा. शिरसीकरांनी, श्री. वेहेर यांना बोलण्याची विनंती केली. लालभडक चट्ट्यापट्ट्याचा शर्ट, नॅरो बॉटम पँट आणि पॉईंटेड बूट पाहून वाटलं, केसरीतील 'ताळतंत्र' परिसंवादाला युवकांचे प्रतिनिधी म्हणून त्यांना न्यायला हवं होतं.– 'दलितांच्या प्रश्नाला गंभीर व स्फोटक वळण लावलं आहे...ते दरिद्री असल्याने सधन त्यांच्यावर अत्याचार करतात–त्यांना आर्थिक दृष्टचा स्वयंपूर्ण केलं पाहिजे–हे अवघड नाही...दलितांवर विद्यापीठात अन्याय केले जातात हे पुराव्यानिशी सिद्ध करता येईल. लाचलुचपत, वशिलेवाजी या समाजाच्या रक्तात मुरली आहे. त्याविरुद्ध दीर्घकालीन उपाययोजना केली पाहिजे. पण राजकीय पक्ष सत्तालोलुप आहेत...हा प्रश्न युद्धपातळीवर सोडविला पाहिजे. दलितांना अनेक उत्कृष्ट संध्या उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.' (संधीचं इतकं 'चार्मिंग' आणि गोड अनेकवचन ऐकलं नव्हतं.)

वेहेरे बोलत असतानाच आ. ढेरे आणि श्यामकांत मोरे आले. पाचच मिनिटांनी रामभाऊ म्हाळगी आले. (मतपत्रिकेवर त्यांचं 'रामचंद्र काशिनाथ म्हाळगी' असं संपूर्ण नाव वाचून माझा एक मित्र 'रामभाऊ म्हाळगींचं नाव नसल्याने तसाच परत आलो' असं सांगत होता!) शंकरराव खरात सीरियस् होऊन नोटस् काढत होते. रामभाऊ शांतपणे काहीतरी वाचत होते. (विधानसभेत प्रश्न विचारायचा असेल. १५०० प्रश्न व्हायला पाहिजेत ना!)

रामभाऊंचं नाव पुकारलं गेलं– नाटकात पुढाऱ्याला देतात तस्सा वेष. जाकिट, नेहरू शर्ट वगैरे. 'अध्यक्ष महोदय' अशी खणखणीत आवाजात आरोळी ठोकून, लाऊडस्पीकरची आपल्याला जरूर नाही हे सिद्ध करत, भाषणाला सुरुवात झाली.–'हा विषय परिसंवादाचा व्हावा हीच खंत आहे' (मी शेजारील मुलीला हाच प्रश्न आपण प्रा. बापटांना आधीच कसा विचारला हे पटवत भाव खायचा प्रयत्न केला पण तिने 'माहीत आहे, सर्वच जो (ति) शी एखादी घटना घडून गेल्यावर अशीच बढाई मारतात.' अशा नजरेने पाहिले. असो.)

'हा प्रश्न सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन सोडविला पाहिजे. केवळ शासनावर सर्व जबाबदारी नाही (शासन हा एक घटक आहे. एकमेव नाही)... सामाजिक संघटनेची जरुरी आहे... दुसऱ्यांनी काय करावे यापेक्षा आपण काय करणार आहोत याचा विचार व्हावा...समता हा एक टप्पा आहे, साध्य नव्हे...

आपल्याला समतेकडून एकात्मतेकडे जायचं आहे...'आपणात मधेच' 'पटत नसेल तर Step down, Get out असं सांगण्याची वेळ आली आहे.' असं जोरकस बोलून रामभाऊंनी हवा तंग केली.

स्टार्च केलेले कडकडीत कपडे घातलेले शिवाजीराव ढेरे विशेष नवा मुद्दा

न मांडता बोलले. ' विद्यार्थी या प्रश्नाबाबत जागृत व जिज्ञासू आहेत हे या परिसंवादावरून पटतं ' (मी विद्यार्थी असल्याचं प्रचंड समाधान वाटू लागलं) —' या प्रश्नाबाबत अगदीच काही झालं नाही हे खरं नाही. शासनसुद्धा आपल्या परीने प्रयत्न करीतच आहे ' (येथे मला वसंतराव नाईक विधानसभेत उत्तर देताहेत असा विचित्र भास झाला)... जर ठरवलं तर हा प्रश्न काही फार मोठा नाही (नाही तर काय, इतका वेळ बेहरे आणि म्हाळगी उगाचच आकांडतांडव करत होते ! )—पण राजकीय भेद दूर ठेवले पाहिजेत...दलितांसाठी विशेष सवलती देण्याने हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होतोय की काय अशी शंका येते. वेगळा मार्ग शोधला पाहिजे. (सांगून टाका बुवा लवकर कोणता मार्ग तो. आम्ही अगदी अधीर झालो आहोत ! )

रामभाऊंनी सरकारला ज्या टपला मारल्या त्यांना उत्तर देण्याची नैतिक जबाबदारी आपल्यावरच आहे अशा कर्तव्य भावनेतून आ. ढेऱ्यांनी महापौर-निवडणुकीच्या वेळचा (भाऊसाहेब चव्हाण निवडून आले तेव्हाचा) ' मजेदार किस्सा ' सांगितला. मला सारखी रामभाऊ आता हरकतीचा मुद्दा उपस्थित करताहेत की काय अशी धास्ती वाटू लागली. आ. ढेरे बोलत असतानाच ' सोवत ' कार निघून गेले. (इतक्या तडफदार गृहस्थाला ' सोवत ' कार हे विशेषत अगदीच मिळमिळीत वाटतं. विशेषतः भालाकार वगैरेंच्या तुलनेने,) शंकररावांचं नोटस् घेणं चालूच होतं.

भाषणं चालू असताना मधेच एकदम घंटा वाजायची (विद्यापीठातसुद्धा तास संपल्यावर घंटाच वाजवतात हे पाहून आसुरी आनंद झाला ! )—आणि ' प्रगल्भ शिक्षण घेणारी ' (आ. ढेऱ्यांनीच हे Compelment दिलंय्) तरुण पिढी बाहेर पडण्यासाठी अस्वस्थ व्हायची —



तास चालू असताना विद्यापीठात झोपतात की नाही ते माहीत नाही. अन्यथा 'जागी व्हायची' असं म्हटलं असतं.

मला शंकरराव खरातांच्या भाषणासंबंधी उत्सुकता होती. आतापर्यंत सर्वांनी हा प्रश्न गंभीर हेच परत परत उगाळून हैराण केलं होतं. खरातांनी पहिली बरीच मिनिटं अत्याचारांचं वाङमयीन भाषेत चित्रण करण्यात घालवली. विद्यापीठातनं, इतरत्र नोकऱ्या देताना कसे अन्याय केले जातात ह्याचं वर्णन झालं स्पश्य समाज आणि राजकारण्यांवर ताशेरे झाडून झाले. (स्पृश्य समाजाला हृदय आहे का? का तेथे दगड, पत्थर बसवलाय्?) शेवटी त्यांनी (त्यांच्या मते) व्यावहारिक आणि उपयुक्त मार्ग सांगितले- १) दलितांची स्वतंत्र खेडी स्थापन करावीत. यासाठी जंगलं आणि सीलिंगमुळे मिळणारी जादा जमीन यांचा उपयोग करावा...यात फुटीरपणा भावना नाही ...(इतका सोपा आणि सुटसुटीत उपाय शासन का करत नाही कोण जाणे!) २) दलितांचे शहरीकरण केले जावे. त्याकरता कारखानदारीच्या आसपास त्यांना घरं दिली पाहिजेत... कारखानादारांवर दलितांना नोकऱ्या देण्याची सक्ती केली पाहिजे...'

कारखानदारांची 'उद्योगपती' म्हणायला लागल्यापासून खरोखरच्या 'पति'हून केविलवाणी अवस्था झालीय!)

दुसरा उपाय अमलात यायला औद्योगिक भरभराट हवी पण श्री. खरातांनीच प्रथम 'आधी राजकीय की आधी सामाजिक' या वादात 'राजकीय'ला यश मिळाल्याने आणि स्वातंत्र्यानंतर 'आधी सामाजिक की आधी आर्थिक' या वादात 'आर्थिक'ला प्राधान्य मिळालं म्हणून खेद दर्शविला. पहिल्या वादाबद्दल आता बोलण्याचं कारण नाही, पण आर्थिक उन्नतिशिवाय सामाजिक न्याय कसा मिळणार? शंकरराव खरातांनी निराशा केली. मला स्वतःला तरी त्यांचे हे दोनही तोडगे अफलातून वाटतात. त्यांची अंमलबजावणी करणारं सरकार कोठे मिळेल? त्याची चौकशी केली पाहिजे. अर्थात या मार्गाने जरी अनेक शतके पिचत पडलेला हा दुर्दैवी समाज सुखी झाला तर कोणालाही आनंदच होईल.

शेवटी प्रा. शिरसीकर ५-१० मिनिटच बोलले. पण त्यांनी एक विचित्र मुद्दा मांडला-' आज येथे ३ स्पृश्य आणि १ अस्पृश्य असे वक्ते आहेत. याच्या उलट जर प्रमाण असतं तर परिसंवादाला वेगळं वळणं लागलं असतं.'

प्राध्यापकसाहेबांना असं का वाटलं कळत नाही. खरातांशिवाय इतर तिघाजणांना या प्रश्नाची माहिती किंवा आंच नव्हती का? वेगळे वळण म्हणजे 'साधने'च्या थाटाचं?

वक्त्यांचें आभार मानतानासुद्धा खरातांचे 'विशेष आणि पुन्हा' आभार मानले. का म्हणून?

रामभाऊ, आ. ढेरे आणि ग. वा. बेहरे काय वेळ जात नव्हता म्हणून आले होते की काय?-पण नाही.

आपल्या मनातच अजून कुठेतरी परकेपणाची भावना, दुराव्याची भावना घर करून आहे, असं वाटतं.

मोहन रानडयांनी परत सर्वांचे आभार मानले, पुष्पगुच्छ देताना रामभाऊचं नाव पुकारल्यावर (सुद्धा) शिरसीकरांनी शंकरराव खरातांनाच (चुकून) गुच्छ दिला ! श्री. रानडयांनी शिरसीकरांचे आभार मानताना दांडी उडवली–' प्रा. शिरसीकर आले, येथे बराच वेळ बसले, आपल्याला चार शब्द सांगू ' शकले ' याबद्दल आभारी आहे. ' (शिरसीकरांना केवळ कृतार्थ वाटलं असेल ! )

गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात जसे श्रोत्यांचे आभार मानतात तसे येथेही मानले गेले. ' आपणच आला नसतात तर हा कार्यक्रम कसा झाला असता ?' आधी एकतर पुण्यात श्रोते नाहीत असं होणार नाही आणि पुढे कोणीही नसताना बोलणारेसुद्धा रगड आहेत. पुणेरी श्रोता अशा सामुदायिक आभारावर तृप्त असतो.

तास संपल्यावर व्हावा तसा अर्ध्या मिनिटात हॉल रिकामा झाला. एरवी अर्ध्या तासाच्या भाषणावर दोन दोन तास वादविवाद एखाद्या वक्त्याभोवती कोंडाळं करून होतात. पण ही युनिव्हर्सिटी आहे ना ! येथे सर्वच Out of way (म्हणजेच वेगळं–हा विद्यापीठीय वास्तव्याचा परिणाम ! ) □ □ □


# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य : रुपये चौदा

राजहंस प्रकाशन

पुणे ३०



# आऊटर सिग्नल्स....

रमेश गाडे

प्लॅटफॉर्म माणसांनी नुसता गजबजून गेला होता. नाना प्रकारच्या आवाजांनी कोंदला होता. अन् त्या गोंगाटापेक्षा आपला स्वर उंचावित बोलण्याची खबरदारी घेत माणसं बड-बडत होती. हुंदके दाबत हसत होती अन् हसता हसता हुंदकत होती. जवळ येणाऱ्या प्रत्येक क्षणी कुणीतरी कुणा-पासून दूर होत होतं अन् त्या प्रत्येक क्षणी दोघांचं विश्व संकुचित होत खिड-कीशी ओठंगत होतं. जे क्षण ताटातूट जवळ आणीत होते तेच आता ओला-

व्यानं भिजून जात होते. ह्या क्षणी सावलीचा गारवा पाहून विरहाचं ऊन तडकत होतं. अधिक वेगानं जवळ येऊ पहात होतं.

सुमा कधीपासनं तरी त्याच्याजवळ जायचा विचार करीत होती. पण त्याचे कोंडाळं करून जवळ उभे असलेले मित्र तिला तसं करूच देत नव्हते. तो मधून मधून तिच्याकडे पाही तेव्हा वाटे, सरळ जाऊन त्याला मिठी घालावी. जाऊच देऊ नये कुठं! मग ताटातुटीच्या गोष्टी मनात येत अन् ती कोमेजून जाई. गालावरची लाली पुसली जाते न जाते तोच डोळे जोर करीत अन् त्यांना ओठ घट्ट मिटून ठेवून सावरून धरणं तिला अशक्य होई. ती कासावीस होत होती. त्याचे मित्र कुठल्या तरी चरबट गप्पा करीत त्यांचा वेळ खात होते.

अखेरीस त्याच्या एका मित्रानं दटाविलं, " अरे, त्याला वहिनीबरोबर बोलू द्याल की नाही ? की तुमचीच टकळी...

त्यानं असं म्हटल्याबरोबर सर्वांनी एकदम, " ओऽसॉरी, सॉरी ! " असे उद्गार काढले अन् ते सर्व गडगडल्यासारखं हसले.

अन् मग सर्वांनी हळूच काढता पाय घेतला. पहिल्यांदा बोलणाऱ्यानं हळूच म्हटलं, " सांभाळून ! " अन् पाठीवर थाप मारीत तोही इतरांबरोबर निघून गेला.

डब्यासमोर आता ती दोघंच उभी होती.

तिला काय बोलावं हे सुचत नव्हतं अन् इतकं सुचत होतं की शब्द सापडत नव्हते. पँटच्या दोन्ही खिशात हात घालून तोही गप्प उभा होता.

शेवटी तिनं विचारलं, " डब्यात तुम्ही एकटेच ?"

" एक शेठजी आहेत फक्त. "

ती थोडावेळ गप्प उभी राहिली. मग त्याच्या डोळ्यात पाहत म्हणाली, " आत बसू या का आपण ?"

तो काही बोलला नाही. खांदे जरासे उंचावीत त्यानं डब्याचं हँडल धरलं नि तो वर चढला. त्याच्या पाठोपाठ ती.

फर्स्ट क्लासच्या त्या 'कुपे'त ती दोघं समोरासमोर बसली.

तो खरोखर किती उमदा दिसत होता ! उमदा होताच, अन् गणवेषानं जास्तच दिसायचा. स्वच्छ घोटलेली दाढी अन् कोरीव मिशा त्याला शोभून दिसत होत्या. आपल्या नवऱ्याचं राजबिंडं रुप तिनं मनसोक्त न्याहाळलं अन् स्वतःला नकळत ती त्याच्या शेजारी जाऊन बसली.

" बोलायचं नाही माझ्याशी ?" तिनं हळूच विचारलं, " अजून राग नाही गेला ?"

त्यानं हळूच तिचा हात हातात घेतला अन् तिच्या मनात कालच्या प्रसंगाची स्मृती ताजी झाली.

जेवण झाल्यावर पान खायला जातो म्हणून तो बाहेर पडला होता. अन् थोड्यावेळानं परत आला होता. त्यानं तिला पाठमोरं असतानाच आरशासमोर धरलं होतं अन् हळूच तिची हनुवटी वर केली होती.

दोघांच्या मुखाआड आपला हात

धरीत तिनं किंचीत नाराजीनं म्हटलं होतं, "शी! केवढा सिगरेटचा वास!"

अन् तो एकदम ऑफ झाला होता. तिला सोडून व्हरांड्यात खांबाला टेकून उभा राहिला होता.

त्याला समजावता समजावता तिला मुश्किल झालं होतं.

सप्तटाच्या वेळी त्याचं डोकं तिच्या मांडीवर होतं. अन् तो म्हणत होता, "सुमा, ह्या सिगरेटनं मला प्रत्येकदा साथ दिली आहे ग. माझं कुणीच नव्हतं ना!"

तिनं त्याचं नाक बोटाच्या चिमटीत धरून हलवीत म्हटलं होतं, "आता मी आहे ना!"

"मग तूच सोडव ही सवय!"

तिनं हसून त्याला काहीतरी प्रत्युत्तर दिलं होतं. अन् ती दोघं अंधारात बुडाली होती. तिला आठवत होता तो फक्त त्याचा राकट अन् काहीसा अमानवी आवेग.

तिला हे आठवलं नि तिनं एकदम विचारलं, "सिगरेटी घेतल्यास?"

त्यानं होकारार्थी मान हलवूनही तिचं समाधान झालं नाहीच. तिनं घाई-घाईनं त्याची सूटकेस उघडली नि डबा असल्याची खात्री करून घेतली.

त्याच्या अधिक जवळ सरकत तिनं त्याच्या मांडीवर हात ठेवला अन् मान फिरवित विचारलं, "पत्र टाकाल?"

पण तिच्या स्वरानं तिला फसवलं. त्यानं चमकून तिच्याकडे पाहिलं अन् म्हटलं, "सुमा, तू रडतेस?"

मग मात्र तिला हुंदका आवरला नाही. तिनं डोळ्यांना रुमाल लावला.

तो काहीसा अस्वस्थ झाला. चुळबूळ करू लागला. नकळत त्याच्या तळव्यांना घाम फुटला. चेहऱ्यावरच्या रेषा आक्रसू लागल्या अन् तो घाईघाईनं चिरक्या स्वरात उद्गारला, "सुमा, डोन्ट, प्लीज स्टॉप इट. आय् कान्ट स्टॅन्ड." अन् तिनं घाईघाईनं डोळे पुसले.

महाबळेश्वरलाही तो असंच काहीसं म्हणाला होता. तिच्या डोळ्यातळं पाणी त्याच्यानं कधीच बघवलं नव्हतं. तिनं त्याला तेव्हा विनविलं होतं, "अशोक, पत्रं टाकशील मला छान. लांब! मी पत्रावर जगेन, तुला पुन्हा सुटी मिळे-स्तोवर!"

तो म्हणाला होता, "सुमा, मला लिहिता येत नाही ग! लिहायला बसलं की बोटं कापायला लागतात. अन् बोलायला लागलं की ओठ थरथरतात. मन मारायची सवय आहे मला सुमा, उघडं करायची नाहीय्!"

तिनं त्याच्या छातीवर मान टेकवीत म्हटलं होतं, "माझ्यासाठी करावी लागेल ती! मी बायको आहे तुझी! नं?"

तो एकदम हसला होता नि त्यानं तिला आणखीच जवळ घेतलं होतं. त्या गडबडीत तिच्या ओल्या कुंकवाचा ठसा त्याच्या शर्टावर उमटला होता अन् तोच शर्ट घालून तो कितीतरी दिवस तिच्या-सवे मिरवीत राहिला होता.

तिनं विचारलं, "तो शर्ट घेतलात?"

त्यानं आपल्या गणवेषाची बटनं उघडली अन् अंगातला शर्ट दाखविला.

ती सुखावली. एवढ्या जीवघेण्या उष्म्यात तेवढा सरंजाम वागवीत तो जाणार होता ह्याचं तिला कौतुक वाटलं. ती उठली अन् तिनं पंख्याचं बटन दाबलं. पाती गरगरायला लागली तशी ती त्याच्याजवळ परत आली. येताना खिडकीचं शटर पाडून.

फर्स्ट क्लासच्या 'क्लोज्ड इन' कंपार्टमेंटमध्ये आता ती दोघंच उरली. नादाचे समुद्र बाहेर राहिले अन् मौनातला नाद सुरू झाला.

खाली बसताना तिनं हळूच त्याच्या कपाळावर ओठ टेकले. अन् भडभडून आल्यासारखं ती बोलू लागली, "सिगरेटी कमी ओढायच्या, दारु त्याहून कमी! अन् त्रास करून घेऊ नका स्वत:ला थंडीत पुल-ओव्हर शिवाय बाहेर पडायचं नाही? वाढदिवसाला मला जपानी ट्रांझिस्टर पाठवाल. अन् आठवड्याला एक पत्र नेमानं. कार्ड तरी!"

तिच्या शेवटच्या वाक्यानं तो गदगदला. तिला जवळ ओढीत म्हणाला, "सुमा, तुला सोडून जावसंच वाटत नाही ग!" अन् त्याची बोटं तिच्या दंडात रुतत चालली.

तिला फार बरं वाटलं. हे ऐकायलाच तर तिचे कान आतुर होते. ते अमृताचे शब्द तिनं ऐकले अन् ती मोहरून गेली. 'मलाही!' तिनं म्हटलं अन् ती पुढं म्हणाली, "पण विरहानं प्रेम जास्त वाढतं नं?"

"रबीश!" तो म्हणाला अन् तिनं ब्लाऊजमध्ये ठेवलेलं प्लॅटफॉर्म तिकीट त्यानं अलगद काढून घेतलं. उलटं सुलटं करून ते तो पाहायला लागला.

"द्या!" तिनं म्हटलं. पण त्यानं न ऐकल्यासारखं केलं. अन् तिच्या काही लक्षात येण्याआधीच खिडकी उघडून, मेलेला उंदीर टाकावा तसं ते तिकीट चिमटीत धरून त्यानं बाहेर टाकून दिलं.

बाहेर गार्डाची धावपळ सुरू होती.

"हे काय केलंत? आता परत कशी जाऊ मी?"

"जायचंच नाही!" तो म्हणाला अन् अन् त्यानं तिचा हात धरला!

गार्डाची शिटी वाजली.

"असं काय करता? सोडा. गाडी सुटत्येय्!"

"सुटू दे!" तो बेफिकीरीनं बोलला.

यावर ती काहीतरी बोलली पण एंजीनच्या शिटीच्या आवाजात तिचे शब्द बुडून गेले.

स्वत:चा हात सोडवून घेण्याचा तिचा प्रयत्न निष्फळ होत होता. स्टेशनवरची माणसं पाचोळ्यासारखी हळूहळू मागं पडत होती. त्याचे मित्र आ वासून त्यांच्याकडे पाहत होते. गाडी हळूहळू वेग घेऊ लागली होती.

पूर्ण शक्ती एकवटून तिनं हात सोडवून घेतला अन् ती दाराकडे लपकली. एवढ्यात त्यानं तिला एकदम मागे खेचलं अन् तिच्याकडे पाहत काहीशा जरबेनं तो म्हणाला, "सुमा, मला हवी आहेस तू! जाऊ देणार नाही मी तुला अशी!" अन् खोल श्वास घेत तो पुढं बोलला, "खूप माणसं उतरलीत आतापर्यंत आयुष्यातनं!"

"अहो, पण पुढे?"

"पुढचं पुढे!"

गाडीनं आता चांगलाच वेग घेतला होता. स्टेशनचे आउटर सिग्नल्स कधीच मागं पडले होते.

□ □ □

आपल्याकडे पत्रसंग्रहवृत्तीचा मुळातच अभाव, त्यातून असा काही भाग कुठे आढळल्यास तो हस्तगत होणे कठीण आणि प्रसंगवशात हस्तगत झाला तरी त्याच्या प्रकाशनास संबंधितांकडून अनुमती मिळविणे त्याहूनही कठीण; आपला या क्षेत्रातला सारा व्यवहार 'खाजगीपणा'च्या चमत्कारिक कल्पनांनी ग्रस्त आहे. परिणामी, मराठी संस्कृतीच्या आकलनाला उदयुक्त ठरणारे एक महत्वाचे साधन कळत न कळत उपेक्षितच रहाते. ही कोंडी फोडण्याचे श्री. मोटे यांचे हे कसोशीचे प्रयत्न यामुळेच अभिनंदनीय ठरतात...

पुस्तके

गो. म. कुलकर्णी

# 'विश्रब्ध शारदे'चे बोलकेपण

वाढत्या साक्षरतेमुळे मराठी ग्रंथ-प्रकाशनात वाढ होत जाणे स्वाभाविक आणि स्वागतार्हही; परंतु या उदंड प्रकाशनांपैकी फारच थोडी सत्त्व-पूर्ण ठरतात. पुस्तकांची ही अशी सपाट वीण साहित्य–संस्कृतीच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अयोग्यच; व्यवसायबद्ध प्रकाशकांकडून यावर काही तोडगा काढला जाण्याची शक्यताही कमी. शासनसंस्था, साहित्यमंडळे, विद्यापीठे वगैरेंनी याबाबतीत काही पुढाकार घेतला तरच ही दुरवास्था दूर होण्याचा संभव. अद्यापि तरी तशी काही ठळक चिन्हे दृष्टिपथात येत नाहीत. अशा परिस्थितीत सांस्कृतिकदृष्ट्या मोलाचा ठरणारा 'विश्रब्ध शारदा' सारखा बृहद्ग्रंथ प्रकाशित करण्यास ह. वि. मोटे प्रकाशनाने पुढे यावे, हे निःसंशय

कौतुकाचे. प्रकाशनाच्या आपल्या पंधरा वर्षांच्या ( १९५७–१९७२ ) कारकीर्दीत मोटे-प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांची संख्या मोजकीच असली तरी गुणवत्तेच्या दृष्टीने ती उपेक्षणीय नाही. शक्यतो साहित्य–संस्कृतीच्या अभ्यासाला पूरक होतील अशीच पुस्तके प्रकाशित करण्याकडे या संस्थेचा कल दिसतो. या संस्थेची 'गावगाडा' 'अप्रकाशित गडकरी' प्रकाशन प्रतिभा ', ' बहुरूपी ', ' गावरहाटी ', ' कुसुमानिल ' यासारखी या पूर्वीची प्रकाशने आणि आता ' विश्रब्ध शारदे 'सारखा द्विखंडात्मक प्रकाशनाचा या संस्थेने हाती घेतलेला उपक्रम याचीच साक्ष देतो. या योजनेतील पहिला खंड परवाच्या महाराष्ट्रदिनी प्रकाशित झाला. दुसरा प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

' विश्रब्ध शारदे 'ची एकंदर कक्षा विस्तृत आहे. हीत १८१७ ते १९४७ पर्यंतच्या म्हणजे ब्रिटिश राजवटीच्या आरंभापासून अंतापर्यंतच्या कालातील विविध क्षेत्रांतील विविध व्यक्तींच्या पत्रांचे संकलन, संपादन आणि प्रकाशन अभिप्रेत आहे. यामधून ब्रिटिश राजवटीच्या शंभर-सव्वाशे वर्षांच्या कालावधीत मराठी समाजात व संस्कृतीत ज्या हालचाली, क्रिया-प्रतिक्रिया, आशंका, आंदोलने, समस्या, प्रवृत्ती उद्‌भवल्या; स्थित्यंतरे घडली; त्यांचा एक विस्तृत पत्रपट सादर करण्याची भूमिका आढळते. प्रकाशित खंडात समाज आणि साहित्यविषयक पत्रांचा संग्रह ग्रंथित झाला असून दुसऱ्या खंडात नाट्य, संगीत, चित्र, शिल्पविषयक पत्रे अंतर्भूत केली जाणार आहेत. दोन्ही खंडांतील एकूण पत्रांची संख्या आज जरी समोर नसली तरी प्रकाशित खंडातील पत्रांची संख्याच दोनशे ब्याण्णव आहे आणि ही पत्रे संकलित केलेल्या एक हजार पत्रांतून निवडली गेली आहेत. प्रकाशकांच्या पत्रविषयक व्यापाची यावरून कल्पना यावी.

पत्रसंकलन, संपादन आणि प्रकाशन हा श्री. मोटे यांचा अत्यंत आवडता छंद दिसतो. १९२२ पासून आपल्याला हा छंद जडल्याचे व या छंदातच आपल्या वाङ्मयप्रकाशनाची प्रेरणा असल्याचे श्री. मोटे सांगतात. ' विश्रब्ध शारदे '-पूर्वीच ' प्रकाशन प्रतिभा ' आणि ' कुसुमानिल ' हे दोन वैशिष्ट्यपूर्ण पत्रसंग्रह श्री. मोटे यांनी प्रकाशित केलेले आहेत. ऐतिहासिक पत्रे वजा करता या साहित्याचे मर्म व महत्त्व हेरणारी आणि तनमनधनाने दीर्घकालपर्यंत त्याचा पाठपुरावा करणारी व्यक्ती आज तरी श्री. मोटे यांचेखेरीज अन्य कोणी दिसत नाही. आपल्याकडे पत्रसंग्रहवृत्तीचा मुळातच अभाव, त्यातून असा काही भाग कुठे आढळल्यास, तो हस्तगत होणे कठीण, आणि प्रसंगवशात हस्तगत झाला तरी त्याच्या प्रकाशनास संबंधिताकडून अनुमती मिळविणे त्याहूनही कठीण; आपला या क्षेत्रातला सारा व्यवहार ' खाजगी 'पणाच्या चमत्कारिक कल्पनांनी ग्रस्त आहे. परिणामी, मराठी संस्कृतीच्या आकलनाला उपयुक्त ठरणारे एक महत्त्वाचे साधन कळत न कळत

उपेक्षितच राहाते. ही कोंडी फोडण्याचे श्री. मोटे यांचे हे कसोशीचे प्रयत्न यामुळेच अभिनंदनीय ठरतात.

'विश्रब्ध शारदे'च्या प्रस्तुत खंडात केवळ अप्रकाशित पत्रेच नसून बरीच प्रकाशित पत्रे व इतरही काही आनुषंगिक मजकूर ग्रथित झाला आहे. अप्रकाशित पत्रे तर उपयुक्त ठरतातच; पण प्रकाशित पत्रांचे विशिष्ट संदर्भातील येथील पुनर्मुद्रणही नव्या अभिप्रायांना जन्म देते. या कालखंडावर आजपर्यंत काही फुटकळ साहित्य प्रसिद्ध झालेले असले तरी या कालखंडाच्या समग्र दर्शनाची व मूल्यमापनाची गरज त्याने भागलेली नाही. आधुनिक महाराष्ट्राच्या संस्कृतिविचारात या कालखंडाचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता तर अशा मूल्यमापनात्मक ग्रंथाची निकड अधिकच जाणवते. या कालखंडाचे यथासांग दर्शन 'विश्रब्ध शारदे'तील पत्रे घडवतील असे नाही; त्यासाठी आणखीही पुष्कळ सामग्री जमवावी लागेल, त्याला केवळ पत्रात्मक स्वरूपाचा प्रतिक्रिया पुरेशी नाही; पण या साधनसामग्रीचे एक महत्त्वाचे अंग या पत्रसंग्रहात समाविष्ट झालेले आहे, यात शंका नाही.

## मौलिक साधन

पत्रसंग्रहदृष्ट्या प्रस्तुत संग्रह परिपूर्ण नसल्याची जाणीव संग्रहकारांनाही आहेच. यात काही महत्त्वाची पत्रे ग्रथित व्हावयाची राहिली आहेत; काही अकारणच आल्यासारखी वाटतात, किंवा हे संकलन अधिक रेखीव व्हावयास हवे होते, वगैरेसारखे आक्षेप या संग्रहावर घेता येण्यासारखे आहेत; ते मान्य करूनही १८४७–१९४७ पर्यंतच्या कालखंडातील कर्त्या स्त्री-पुरुषांचे मानसिक व्यापार, तज्जन्य स्थूल वा सूक्ष्म स्पंदने, सुटेपणाने आणि साकल्याने जाणून घेण्याचे हे एक मौलिक साधन या संग्रहाने हाती येत आहे, याबद्दल वाद नसावा.

पत्र हा व्यक्तिमनाचा त्या क्षणीचा आरसाच होय. या आरशात त्या क्षणीच्या ऊर्मींचे सरळ वा वक्र, धूसर वा स्पष्ट प्रतिबिंब उमटते. तासतास राबून त्या व्यक्तिमनाचा वेध घेणे, निदान त्या क्षणापुरती पत्रलेखकाच्या मनाशी जवळीक साधणे, त्यामुळे शक्य होते. या प्रकारच्या जवळीकीची ओढ सार्वत्रिकच असते. प्रस्तुत संग्रह तर एलफिन्स्टन, लोकहितवादी, फुले, न्या. रानडे, टिळक, आगरकर, सावरकर, आंबेडकर, कर्वे, पंडिता रमाबाई, डॉ. आनंदीबाई, राजवाडे, हरीभाऊ आपटे, केशवसुत, बालकवी, गडकरी, मर्ढेकर यां सारख्या मराठी माणसांचा आकर्षण विषय ठरलेल्या मंडळींची पत्रे आपल्या स्वाधीन करतो. येथे ही मंडळी कधी आपल्या व्यासपीठीय जाहीर आविर्भावात अवतरतात तर कधी आई-वडील, पति-पत्नी, बहीण-भाऊ, सखे-सोबती, गुरु-शिष्य, जेष्ठ-कनिष्ठ इत्यादींसारख्या खाजगी नात्यात. त्यांच्या जाहीर अवतरणांपेक्षा त्यांची ही घरगुती गाठभेटच आपल्या दृष्टीने अधिक मोलाची; त्यातून ती हृदयसंवादात्मक असेल तर उत्तमच; पण अशी पर्वणी क्वचितच

येते. बऱ्याच वेळा तीत उपचारात्मकता शिरलेली असते. अशा वेळी तिचा स्वीकार घोळून पाखडूनच करावा लागतो. या घोळण्या-पाखडण्यातून जे काही कण शिल्लक उरतात; तेही महत्त्वाचेच असतात.

### विस्तृत-विवेचक प्रस्तावना

व्यक्तीच्या व समाजाच्या मानसिक इतिहासाच्या संदर्भात पत्राचे असलेले विशेषत्व प्रा. दि. के. बेडेकर यांनी या संग्रहाला लिहिलेल्या विस्तृत व विवेचक प्रस्तावनेत विशद केलेले आहेच. प्रांजळ पत्रलेखनाच्या आड येणाऱ्या व्यक्तिगत व सामाजिक अडसरांचाही विचार ही प्रस्तावना करते. इतरही अनेक अंगोपांगांचे विवरण तीत आलेले आहे. या संग्रहातील पत्रांच्या आकलनाच्या व आस्वादनाच्या विविध दिशा त्यातून सूचित होतात.

वर्तमानाच्या खाजगी वर्तुळात बंदिस्त असलेले पत्र ज्या क्षणी सार्वजनिक होते, त्या क्षणी त्याच्या कक्षाही रुंदावतात. अन्वयार्थाच्या विविध स्तरांवरून ते स्पंदित होऊ लागते. सहृदयता, रसिकता, विचक्षणपणा, बहुश्रुतता इत्यादींखेरीज या स्पंदनाची विविधांगी प्रतीती येणार नाही. जिव्हाळ्याच्या पत्रात बहुधा जितक्या भरलेल्या तितक्याच सोडलेल्या जागा असतात. सांगण्यापेक्षा सुचविलेलेच अधिक असते. पत्रलेखकाने आपले हृदय मोकळे करण्याचा कितीही प्रयत्न केलेला असला तरी ते अखेर


आंब्या आंब्यावर लिहीलेले असते चोखणाऱ्याचे नांव!

परंतू आंब्याच्या उत्तम लोणच्यावर लिहीलेले
असते फक्त ठाकूरांचेच नांव!!
ठाकूर
लोणची, पापड, मसाले, चटण्या.
माहीम मुंबई.

माणूस रंगतरंग स्पर्धा


स्पर्धा क्रमांक आठ

रत्नाकर मतकरी

आमच्या एका चित्रकार मित्राला नाटकांची भलतीच आवड ! सुप्रसिद्ध मराठी नाटककारांची सारी जुनी-नवी नाटके त्याच्या संग्रही ! एकदा स्वारी एकटीच काही नाटके घेऊन चार दिवस लोणावळ्याला जाऊन राहिली. आल्यावर ' काय वाचले ? ' विचारले असता त्याने दोन चित्रे आमच्या पुढ्यात टाकली. म्हणाला, मी वाचलेल्या दहा नाटकांची नावे तुम्हाला यात मिळतील. चित्रे पाहून आम्हाला फारसा बोध होईना, तेव्हा त्याने सोबत काही वाक्यांची पुस्ती जोडली.

वाचकहो, ती दोन चित्रे आतल्या पानावर (पान २–३ वर) दिलेली आहेत. ती चित्रे पाहून आणि खाली दिलेला मजकूर वाचून तुम्हाला सापडतात का पाहा त्या दहा मराठी नाटकांची नावे. सापडल्यास, त्यांच्या लेखकांच्या नावांसह ती आमच्याकडे पाठवा. **राइट ?**

उदा : चित्र क्र. १ मधे पुजारी देवाला साष्टांग नमस्कार घालीत आहे. साहजिकच नाटकाचे नाव ' साष्टांग नमस्कार '. लेखक : आचार्य अत्रे.



हे देऊळ आहे. देवळाचा कळस अत्यंत मौल्यवान धातूचा केलेला आहे. देवाजवळ रात्रभर तेवत ठेवण्यासाठी नंदादीप लावला आहे. झाडीतून दूरवरच्या दिव्यांचे खांबहि दिसू शकतात. अशा शांत ठिकाणी परमेश्वर व मनुष्य एकरूप होतात.



ही एक गाडी. गाडीला जोडलेले बैल मात्र मातीचे नाहीत. आतला प्रवासी, खजिन्याची पेटी कुणाची नजर पडू नये, म्हणून पानांनी झाकून नेत आहे. या शूर माणसाचे बोलणे दुसरा शांतपणे ऐकून घेत आहे. तो दुसरा माणूस महत्त्वाचा असला तरी काही बोलू शकत नाही. दोघांसाठी गाडीत सुरई ठेवलेली दिसते; परंतु पेले मात्र दोन नाहीत.

नाटकाचे नाव | लेखक

१.

२.

३.

४.

५.

६.

७.

८.

९.

१०.

स्पर्धकाचे नाव, पत्ता आणि वय

माणूस साप्ताहिक : ७ ऑक्टोबर १९७२ : किंमत ५० पैसे
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०. ५७३५९

भरलेलेच राहाते. अति हळुवारपणाखेरीज अशा पत्रांना स्पर्शच होऊ शकत नाही.

काशीताई हेरलेकरांनी आपल्या प्रौढ, सुजाण कन्येचा विवाह आपल्या मनाविरुद्ध ठरत असताही तिला मोठ्या संयमाने आणि अतिसमंजसपणे पाठविलेले पत्र या जातीचें म्हणावे लागेल (क्र. १७०); आपल्या पतीच्या अधिक्षेपात्मक पत्राला आनंदीबाई जोशींनी अमेरिकेहून धाडलेले उत्तरही याच नमुन्याचे (पत्र क्र. ७०).या दोन्ही पत्रांत उभ्या-आडव्या भावनांचे अनेक नाजुक रेशमी धागे गुरफटले आहेत. आत्यंतिक जिव्हाळ्याच्या माणसाचे जिव्हारी झोंबणारे असंमत वागणे; त्यामुळे अपरिहार्यपणे उसळून उठलेली प्रतिकूल प्रतिक्रिया; आणि या प्रतिक्रियेने संबंधित व्यक्ती दुखावली जाऊ नये म्हणून चाललेली मनाची उलघाल; या पत्राच्या ओळीओळीतून प्रतिबिंबित झाली आहे. आनंदीबाई जोशींचे पत्र तर कठीणकोवळेपणाचे एक आदर्श उदाहरण मानावे लागेल.

जिव्हाळ्याची पत्रे स्वभावतःच मार्दवपूर्ण आणि प्रत्ययकारी असतात. त्यांच्या नितळपणामुळे त्यात व्यक्त झालेले विचार-भावकल्पना, पुष्कळदा परिचित असूनही त्यांना अनोखेपण लाभते. 'मृत्यू' या घटनेवर आजपर्यंत अनेकांनी, अनेकदा, अनेक प्रकारे लिहिलेले आहे. पण रियासतकार सरदेसाई आपल्या एकुलत्या एक मुलाच्या परदेशातील अकाली निधनावर जे व्याकुळ भाष्य करतात, ते तसे साधे असूनही भेदक होते (प. क्र. १७८). मृत्यूविषयी नव्याने विचार करण्यास ते उद्युक्त करते. 'मृत्यू'च्या अनुरोधाने आलेली या संग्रहातील सारीच पत्रे अशी बोलकी आहेत. पत्नीच्या निधनाची वार्ता कळल्यानंतर लो. टिळकांनी मंडालेहून श्री. विद्वांस यांना लिहिलेले पत्र (क्र. १४६); डॉ. आंबेडकरांनी आपल्या मुलाच्या निधनानंतर काढलेले उद्गार (प. क्र. (२१७); वीर सावरकरांनी मृत्युशय्येवर असलेल्या आपल्या वडील बंधूंना पाठविलेला संदेश (प. क्र.२८१); गोपाळराव जोशींनी आनंदीबाई कालवश झाल्यानंतर कार्पेन्टर बाईंना या संबधीची कळविलेली हकीकत (प. क्र. ७३); विविध विचारतरंगांना विविधप्रकारे चालना देते. जाताजाता ही पत्रे पत्रलेखनांच्या आंतरस्थितीवरही प्रकाश टाकतात. डॉ. आंबेडकरांसारखा पहाडी अहंतेचा पुरुष प्रस्तुत घटनेने तेवढ्यापुरता पार वितळून जातो. टिळकांच्या पत्रात या अपरिहार्य घटनेला थटपणे सामोरे जाण्याची तयारी आढळते. तर सावरकर वक्तृत्वाने फुलून निघतात. सावरकरांना मनातले वादळ मुक्त करावेसे वाटते, तर टिळक नेहमीपेक्षाही मितभाषी होतात. त्यांच्या या मितलेपणातच एक कल्लोळ कोंडलेला आढळतो.

## दोन नक्षत्रांचा पत्रव्यवहार

लो. टिळकांच्या व्यक्तित्वाच्या विविध छटा समजून घेण्याच्या दृष्टीने या संग्रहातील टिळक-आगरकर, टिळक-केळकर, टिळक-गांधी, टिळक-केतकर,

हा पत्रव्यवहारही नजरेखालून घालण्यासारखा आहे. टिळकांच्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनाचे, तत्त्वविचारांचे, ध्येयधोरणांचे, डावपेचांचे काही पैलू यातून सहजपणे चमकून जातात. टिळक-आगरकर पत्रव्यवहारातून तर या दोन महाभागांचे होणारे दर्शन नेहमीहून फार वेगळे आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या ध्येयवादाची, त्यागबुद्धीची आणि शौर्याची सारी बिरुदावली या दोन नावाशी निगडित असलेली, गडकऱ्यांच्या भाषेत बोलावयाचे तर शुचिर्भूत ब्राह्मणाच्या संध्यावंदनात अंतर्भूत करण्याच्या योग्यतेची ही नावे; या दोन व्यक्तीतील तात्त्विक संघर्षही आकाशातील ग्रहनक्षत्रांच्या शर्यतीसारखा नेत्रदीपक; पण ही नक्षत्रे प्रस्तुत पत्रव्यवहारापुरती तरी सरळ जमिनीवर उतरलेली दिसतात. या पत्रांतून या दोन सहकाऱ्यांचा परस्परांविषयी प्रकट झालेला डंख मानवी स्वभावाचे गूढ अधिकच गहिरे करतो. आगरकरांच्या तप्त, उतावीळ, घायकुत्या पत्रांना टिळकांनी दिलेली उत्तरे कमालीची थंड आणि हिशोबी आहेत. एवढे विरोधनाटय शोधूनही सापडणे कठीण !

एका छोटया रकमेच्या निमित्ताने या दोन श्रेष्ठ त्यागमूर्तींत चाललेली ही रस्सीखेच मराठी माणसांच्या एकंदर आर्थिक ओढाताणीचीही निदर्शक म्हणावी लागेल. आगरकरांची ओढगस्तीची प्रापंचिक स्थिती, दम्याच्या विकारामुळे स्वतःच्या अकाली निधनाची त्यांना जाणवलेली शक्यता, या शक्यतेमुळे निर्माण झालेली कुटुंबियांच्या भवितव्याबद्दलची विवंचना आणि तीतून स्वाभिमानाला धक्का न लावता मार्ग काढण्यासाठी त्यांनी चालविलेली धडपड कासावीस करणारी आहे.

खडतर दारिद्रय आणि प्रखर ध्येयनिष्ठा यांचे द्वंद्व इतिहासाचार्य राजवाडेंनी रियासतकार सरदेसाईंना लिहिलेल्या पत्रातूनही उभे ठाकते (प. क्र. १२०). कुणाचा कसलाच मुलाहिजा न बाळगणारा हा जमदग्नी येथे इतिहास–संशोधनाच्या कामासाठी बडोदे सरकारकडून काही आर्थिक साह्य मिळेल–नाही, याची चाचपणी मवाळ शब्दात करताना आढळतो. राजवाडे यांच्या या पत्राशी संतसाहित्याचे उपासक पांगारकर यांनी होळकर महाराजांना लिहिलेले पत्र (क्र. १६७) ताडून पहावे. राजवाड्यांच्या विचारणेत स्वाभिमानाला तडा जाऊ न देण्याची खबरदारी आहे तर पांगारकरांचे सारेच लिहिणे अघळपघळ. पेच तेच पण ते सोडविण्याची प्रत्येकाची पद्धती किती भिन्न. इतिहाससंशोधक खरे यांचेही एक पत्र या संग्रहात आहे (क्र. १४–४). आर्थिक, अडचणीमुळे संशोधनकार्यात येणाऱ्या अडचणींचा उल्लेख याही पत्रात येतो; पण त्यासाठी अधिक मानाचे व धनाचे चालून आलेले पद ते नाकारतात. स्वमर्यादेत राहूनच होईल तेवढे कार्य ते करू इच्छितात.

उच्चतम ध्येयाकांक्षा व दुर्धर आर्थिक

अडचणी यांच्या कात्रीत महाराष्ट्रीय कार्यकर्ते सततच अडकलेले दिसतात. चित्रशाळेच्या स्थापनेसाठी विष्णुशास्त्री चिपळूणकरांना वापरावे लागलेले गनिमी तंत्र याचेच द्योतक ( प. क्र. ६४). मुंबईच्या नेटिव्ह जनरल लायब्ररीच्या स्थापनेत महाराष्ट्रीय माणसांना रस नाही असे नाही. पण या ग्रंथालयाला ठळक देणगी देणाऱ्यांची यादी पाहिली तर तीत एकजात पारशी-गुजराथी मंडळींचा भरणा दिसतो (पृ. ३९). या पार्श्वभूमीवर सर जमशेटजींनी केलेल्या दानधर्माचा एकंदर आकडा डोळे दिपविणारा आहे(पृ. ३९).

महाराष्ट्रीय माणसाने सार्वजनिक कार्यात बौद्धिक पुढाकार घ्यावयाचा, प्रसंगी अर्थशास्त्रीय तत्त्वांचा उहापोहही करावयाचा; पण प्रत्यक्ष आर्थिक मदतीसाठी मात्र अ-मराठी समाजाकडे वळावयाचे, हा रिवाज तसा जुनाच म्हणावयाचा. इंग्रजपूर्व राजवटीत तर नाहीच; पण वैश्यवृत्तीच्या इंग्रजी अमदानंत व्यापाराशिवाय तरणोपाय नाही; असा आक्रोश करणारा मराठी माणूस प्रत्यक्षात मात्र व्यापार--उदिमाकडे वळलेला नाही. डॉ. भाऊ दाजी किंवा जगन्नाथ शंकरशेठ यासारखी आर्थिकदृष्टचा संपन्न आणि पुढारलेल्या वृत्तीची जी काही तुरळक मराठी मंडळी दिसतात, ती फक्त मुंबईत; अन्यत्र बहुतेकांची धाव आहे ती नोकरपेशाकडे. हा पेशा सांभाळून उरलेल्या वेळात ही मंडळी पोटतिडिकीने, प्रसंगी पोट बांधून सांस्कृतिक कार्यात पुढाकार घेत असलेली दिसतात. त्यातल्या त्यात या मंडळींचा ओढा आहे, तो शिक्षणविषयक कार्याकडे. गोपाळराव जोशीसारखा पोस्टखात्यातला सामान्य कारकून आपल्या पत्नीला परदेशातील अत्युच्च वैद्यकीय शिक्षण देण्याची जिद्द बाळगतो आणि अनेक खटपटी लटपटी करून ती तडीसही नेतो. स्त्री-शिक्षणाची ही आच मराठी माणसात विशेषत्वाने असल्याचे पंडिता रमाबाई व अन्नपूर्णा तर्खड यांच्यासंबंधी या संग्रहात दिलेल्या माहितीवरूनही स्पष्ट होते.

## खानोलकरांची कामगिरी

या पत्रसंग्रहातील पत्रांची पार्श्वभूमी विशद करण्याची कामगिरी श्री. गं. दे. खानोलकरांनी स्वीकारली आहे. त्यांनी पुरविलेल्या माहितीमुळे तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक स्थित्यंतरांवर प्रकाश तर पडतोच; शिवाय काहींची जीवितकार्ये, स्वभाववैशिष्टचेही विदित होतात (काहींनी ती स्वतः होऊनच विशद केला आहेत. उदा. डॉ. भाऊ दाजी, महर्षी कर्वे, आचार्य भागवत इ.) यामुळे पत्रवाचनाच्या अनुषंगाने चरित्रे, अंशात्मक आत्मचरित्रे, इतिहासग्रंथ, निबंध इत्यादींच्या वाचनाचेही श्रेय, हा संग्रह वाचकांच्या पदरात टाकतो. विविध माहितीचे कण अविरतपणे गोळा होत राहून वाचणाच्या एकंदर ज्ञानाला चौरसपणा येत जातो.

ही सारी माहिती साक्षेपाने गोळा करून ती आत्मीयतेने पण वस्तुनिष्ठपणे मांडण्याचे काम सोपे नव्हे. या कालखंडात परस्परविरोधी विचारकल्पनांचे अनेक आवर्त उद्भवलेले

असल्यामुळे तर हे काम अधिकच बिकट ठरणारे. प्रवृत्तिपरत्वे निवेदनाचा काटा कुठल्यातरी एका अंगाला झुकायची शक्यता फार. पण हे सारे टाळून अभिप्रेत संजगवृत्तीशी प्रामाणिक राहण्यात श्री. खानोलकर बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले आहेत. मिशनरी चळवळीची माहिती देताना क्वचित् त्यांचे ताटस्थ्य ढळते. अन्नपूर्णा तर्खड, पं. रमाबाई किंवा डॉ. आनंदीबाई जोशी यांच्याविषयीचे त्यांचे निवेदनही टीकाटिपणीची सीमा ओलांडून जाणारे. काही ठिकाणच्या टीपा अनावश्यक वाटतात तर काही ठिकाणी आवश्यक असूनही त्या द्यावयाचे राहून गेलेले दिसते. उदाहरणार्थ, टिळक-आगरकर पत्रव्यवहारातील दाजी आबाजी खरे संबंध (पृ. २१५) किंवा चहाग्रामण्य प्रकरणातील 'सवाशें 'च्या मेजवानीचा आलेला उल्लेख (पृ. २३७) संदर्भरहिततेमुळे अधांतरी राहतो. संकोच–विस्ताराची अशी काही अंगे वगळल्यास श्री. खानोलकर यांनी हे टीपालेखनाचे काम अतिशय समर्थपणे पार पाडले आहे, यात शंका नाही. ग्रंथाच्या वजनदारपणात त्यामुळे भरच पडते.

खानोलकरांची विस्तारप्रवणता कधीकधी पर्यायाने लाभदायकही ठरते. अन्नपूर्णा तर्खड, पंडिता रमाबाई व डॉक्टर आनंदीबाई जोशीसंबंधीच्या माहितीचा श्री. खानोलकर यांनी केलेला विस्तार, या त्रिमूर्तीची जीवन-गाथा उलगडण्यास सहाय्यक होणारा. या तीनही स्त्रिया महाराष्ट्रातील सांस्कृतिक उत्थापनाच्या अग्रदूती. सर्वसाधारण महाराष्ट्रीय स्त्रीहून त्यांच्या जीवनाची घडण अगदी वेगळी; तिघींचे जीवनप्रवाहही परस्परांहून अगदी भिन्न; पण 'मूळ भारतीय आर्यत्वा 'च्या व आत्मभावसंपन्नतेच्या बाबतीत तिघींत विलक्षण साम्य आढळते. अनाचा जीवनौघ एखाद्या डौलदार पुष्करिणीसारखा काव्यात्म वाटतो, तर रमाबाई व आनंदीबाई यांचे जीवननिर्झर खडकाळ भूमीतून खळाळताना दिसतात; रमाबाईंच्या जीवनाची सरिता पुढे सागररूप तरी पावली. पण बिचाऱ्या आनंदीबाईंचा जीवनप्रवाह अवघ्या बाविसाव्या वर्षी आटून गेला. आनंदीबाईंच्या जीवनाची ही शोकान्तिका नियतीच्या क्रूर चेष्टितातच जमा होणारी; काही अंशी परिस्थितीचा विचित्र ताणही याला कारणीभूत आहेच. सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेशी टक्कर देत देत बाईंनी जो आत्मविश्वास साधला, अल्पवयात स्वतःच्या जीवनाला जो प्रौढ आकार दिला तो विस्मयचकित करतो. बाईंचे जीवन कादंबरीविषय व्हावे यात नवल नाही; किंबहुना कादंबरीहूनही ते अधिक सरस आणि सुरस आहे. पंडिता रमाबाईंच्या जीवनाबद्दलही असेच म्हणता येईल.

डॉ. आनंदीबाई किंवा पंडिता रमाबाईसारख्यांची कादंबरीहूनही चित्ताकर्षक असणारी जीवनचरित्रे सोडली तरी उच्च ललितकृतीत आढळणारे काही घटक या पत्रसंग्रहात इतस्ततः विखुरलेले आहेत. कुठे गुंतागुंतीचा मनोव्यापार उत्कटपणे प्रकट होतो तर

कुठे आंतरसंघर्षाचे लक्षवेधी प्रतिबिंब उमटलेले आढळते; कुठे घटनेतील लोकविलक्षण नाट्य चटका लावते तर कुठे तत्त्वदर्शी विचारांचा स्पर्श घडतो. व्यक्तित्वाचे विविध नमुने तर पावलोपावली आढळतात. या साऱ्यांच्या समवायातून जी संसृतिटीका सिद्ध होते, तीतून शतकभरातील मराठी माणसांचा व मराठी मनांचा संकीर्ण पट उभा होतो.

केवळ मराठी माणसांच्याच नव्हेत तर एल्फिन्स्टन, पेरी, कॅण्डी, विल्सन, ब्रॅडला, मिस कार्पेन्टर, फ्लॉरेन्स नाइटेंगेल वगैरेसारख्या विदेशी स्त्री-पुरुषांच्या मानसिक प्रतिक्रियाही या पत्रपटातून रेखांकित होतात. दोन भिन्न संस्कृतीतील समकालीन व्यक्तींचे समोरासमोर घडणारे हे दर्शन अनेक परींनी वेधक ठरणारे. कोणत्या का हेतूने होईना पण एल्फिन्स्टन, पेरीसारखी राज्यकर्त्या पक्षाची परकीय मंडळी, येथील जनतेच्या सांस्कृतिक उन्नयनासाठी सक्रिय आणि मनःपूर्वक साह्य करीत असलेली दिसतात; येथील कार्यकर्त्यांचे बोट धरून त्यांना चालावयास शिकवितात (प. क्र. २५). ब्रिटिश राजवट ही तत्कालीन भारतीयांना 'दैवी वरदाना'सारखी का वाटली असावी, याची यावरून कल्पना येते. या 'वरदाना'ची दुसरी बाजू मिशनरीमंडळींच्या पत्रांतून व्यक्त झाली आहेच. ब्रिटिश राजवटीच्या विधायक आणि विध्वंसक अंगांतून उद्भवलेल्या विविध प्रतिक्रिया संग्रहभर पसरल्या आहेत. हा पत्रपट कालानुक्रमाने जसजसा पुढे सरकत जातो, तसतशी राज्यकर्त्यांची उदारमनस्कता कमी होत गेल्याचे जाणवते; जागृत स्वकीयांच्या स्वतंत्र व स्वावलंबी हालचाली वाढत्या प्रमाणात दिसू लागतात. अनेक द्वंद्वांना तोंड फुटलेले आढळते.

## नवप्रबोधनाच्या मर्यादा

यातील राजकीय स्वरूपाचे द्वंद्व गतिशील व सरळ रेषेत प्रवास करणारे; सामाजिक द्वंद्वांची वाटचाल अशी सरळ नाही; तिला बरेच उलट-सुलट हेलकावे मिळतात. हे हेलकावे ब्रिटिश राजवटीने निर्माण केलेल्या नवप्रबोधनाच्या मर्यादा स्पष्ट करतात. श्रीपत शेषाद्रीचे धर्मांतर व त्याला परत हिंदुधर्मात घेण्याबद्दल तत्कालिनांनी केलेली खळखळ, प्रबोधनयुगाच्या पहाटकालची (१८४४) असल्यामुळे क्षम्य म्हणता येईल; परंतु अनुक्रमे १८८४ साली उद्भवलेले 'दादाजी विरुद्ध रखमाबाई' प्रकरण (पृ. २०२–२०३); १८९० मध्ये उपस्थित झालेले चहाग्रामण्य (पृ.२३४–२३९) आणि १९०६ साली बळ करून उठलेला 'वेदोक्ता'चा वाद (पृ.३०८–३०९); प्रबोधनयुगाची माध्यान्ह खचितच दर्शवीत नाही. ख्रिस्ती मिशनमध्ये चहा प्यायल्याच्या निमित्ताने निर्माण झालेले वादळ, या प्रबोधनयुगाचा उपरेपणा सरळसरळ उघड करते. पुरस्कृत सुधारणा अंमलात आणण्याबाबतची तत्कालीन सुशिक्षितांची असमर्थता व तज्जन्य खंत न्या. तेलंगांच्या पत्रातून चांगल्या प्रकारे व्यक्त झाली आहे (प. क्र. १०८); न्या. रानडे यांच्या व्यक्तिगत जीवनातही ही खंत होतीच.

व्यक्तिगत दौर्बल्याची ही प्रांजल कबुली समजण्यासारखी आहे; पण वेदोक्त-प्रकरणात प्रकट झालेल्या उच्चवर्णी यांच्या मनाच्या कोतेपणाचे समर्थन कसे करावयाचे? प्रबोधनयुगाने 'साकल्याच्या प्रदेशा'त प्रवेश न केल्याचीच ही निशाणी.

अशा आखडलेल्या मनःस्थितीत वावरणाऱ्या समाजाला र. धों. कर्वे-सारख्यांची परखड बुद्धिवादी धारणा पसंत पडणे अशक्यच. १९१५ साली लिहिलेल्या पत्रात (क्र. २६७) स्त्री-पुरुष-संबंधाविषयी त्यांनी जी विचार-सरणी मांडली आहे, ती आजही मान्य होणे कठीण; मग १९२३ साली त्यांनी प्रसिद्ध केलेल्या 'संततिनियमन'पुस्तका-संबंधी मतभेद माजले असल्यास नवल नाही. या संबंधात (पत्र क्रमांक १८० ते १८३) ज्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या आहेत, त्या गंमतीदार आहेत. या पुस्तकाचे रँ. परांजपेसारख्या बुद्धि-वाद्याने स्वागत केले आहे, यात नवल नाही. काशीताई हेरलेकरांसारखी स्त्रीही या पुस्तकाकडे मनमोकळेपणाने पाहू शकते; परंतु श्री. कृ. कोल्हटकर व न. चिं. केळकर यासारख्या साहित्यक्षेत्रा-तील तत्कालीन धुरिणांनी जे अभिप्राय दिले आहेत, ते हातचे राखून दिल्या-सारखे वाटतात. तत्कालीन साहित्याची सृष्टीच एकंदरीने संकुचित आहे.

## दुर्लक्षित बाजू

'विश्रब्ध शारदे'तील साहित्य-विषयक पत्रे या व इतरही अनेक कार-णांनी समाधानकारक वाटत नाहीत. एक तर साहित्येतर घडामोडींच्या तूलनेने येथे साहित्यव्यवहाराकडे दुर्लक्ष झाले आहे, शिवाय जी साहित्यविषयक पत्रे दिली आहेत, ती पुरेशी प्रातिनिधिक नाहीत. साहित्यविषयक पत्रांची साहित्ये-तर पत्रांशी अशा प्रकारची सांगड घालण्यापेक्षा त्यांचा वेगळा संग्रह काढणे योग्य झाले असते. किंबहुना साऱ्याच विषयांचे राजकीय, सामाजिक, धार्मिक... इ) पृथक पृथक संकलन अधिक उपयुक्त ठरेल.

तथापि, साहित्यविषयक पत्रांबाबत येथे जे असमाधान जाणवते, ते केवळ या तांत्रिक कारणांमुळे नव्हे; या पूर्वीचा 'प्रकाशन प्रतिभे'सारखा केवळ साहित्यविषयक संग्रहही असाच असमा-धान देणारा, म्हणून या असमाधानाचे मूळ बीज या साहित्याच्या अंगभूत व्यवहारातच शोधावे लागेल. ज्या नव-प्रबोधनाकडून आधुनिक साहित्याने प्रेरणा घेतल्या, ते प्रबोधनच अर्धविक-सित राहिल्याचा हा परिणाम असावा. या अर्धविकसिततेची अस्वस्थ करणारी जाणीव केशवसुत किंवा बालकवी-सारख्यांच्या एखाद्या-दुसऱ्या उद्‌गारातून जाणवते (प. क्र. १३४ व १६२); पण इतरत्र चाललेला साहित्यविचार बरा-चसा आत्मतृप्त व पृष्ठस्पर्शी आहे. ह. ना. आपटे, गडकरी, बी, चंद्रशेखर, लक्ष्मीबाई टिळक, तांबे, अनिल, माधव जूलियन, फडके, अत्रे, सानेगुरुजी, पु. ल. देशपांडे, वा. ना. देशपांडे, के. नारायण काळे, प्रभाकर पाध्ये, गीता साने, विभावरी शिरूरकर, मर्ढेकर, यांसारख्या

जुन्या-नव्या प्रथितयश साहित्यिकांची पत्रे या संग्रहात संकलित झाली आहेत; पण त्यातील फारच थोडी लक्षणीय वाटतात.

तत्कालितांच्या आवडीनिवडी, अभिरुचिविशेष प्रवृत्ती जाणून घेण्याच्या दृष्टीने मात्र यातील काही पत्रे थोडीफार उपयोगी पडणारी. पु. ल. देशपांडे व के. नारायण काळे यांच्यात इब्सेन–शेक्स्पीअरसंबंधी झालेली चर्चा (प. क्र. १८९–१९२). वा. ना. देशपांडे यांनी 'बंधनाच्या पलीकडे' वर प्रकट केलेला निर्भिड अभिप्राय (प. क्र. १९३). किंवा विभावरी शिरुरकर यांनी 'प्रतिभे'च्या संपादकांना लिहिलेले पत्र (क्र. २०३), या दृष्टीने उल्लेखनीय आहे. वां आणि चंद्रशेखर यांच्या पत्रांतून काही व्यक्तिगत माहितीचे कण हाती लागतात (प. क्र. १९७ व १९८); 'विविधज्ञानविस्तार' चे मोरमकर व 'मनोरंजन'कार मित्र यांनी सुबंधिताना लिहिलेल्या पत्रांतून या दोन मातबर संपादकांचे संपादकीय धोरण स्पष्ट होते आणि जांभकर–माटे पत्रव्यवहारातून अव्वल दर्जाच्या नियतकालिकाची सततची दैना उघड होते (प. क्र. २५४); पत्र क्रमांक एकशे पंचाण्णवमध्ये माधव जूलियन यांनी 'विरहतरंगा'च्या शेवटासंबंधी मांडलेला विचार, या खंडकाव्याच्या संबंधातील एक नवे वादस्थळ म्हणून नमूद करावासा वाटतो. कवी मर्ढेकर यांचेही एक पत्र या संग्रहात अंतर्भूत झाले आहे (क्र. २३६); त्या पत्रा-

# राजा शिवछत्रपती

## ब. मो. पुरंदरे

किंमत : तीस रुपये

प्रकाशक
महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान
सातारा

एकमेव विक्रेते
राजहंस प्रकाशन
पुणे

वरून नवकवितेचा हा उद्गाता एके-काळी गडकरी शैलीने भारावला असावा, असे वाटावयास लागते. गडकरीप्रेम 'बी' च्या पत्रातूनही प्रकट झाले आहे. श्री. खेडकर यानी श्री. मोटे यांना लिहिलेल्या पत्रातही (क्र २६०) गडकरी गौरव येतो. स्वकालिनांप्रमाणेच उत्तर-कालिनांवरही गडकऱ्यांचा प्रभाव किती होता याचे हे द्योतक आहे.

बदलत्या काळाप्रमाणे लेखनशैलीत होत गेलेले बदल न्याहाळण्याच्या दृष्टीने या संग्रहातील सारीच पत्रे महत्त्वाची. इंग्रजी राजवटीच्या आरंभकाली राज्य-कर्त्यांना लिहिलेल्या पत्रांवर फार्सीची मुद्रा आहे; दादोबा पांडुरंग यांनी मराठीच्या जोडीने फार्सीचेही व्याकरण लिहिले होते (प. क्र. १६). मराठी भाषा शिकण्यासाठी रे. विल्सनला कोकणात जावे लागले. (प. क्र. १२) याच पत्रात रे. विल्सनच्या पत्नीने मराठी भाषा शिकण्याच्या आड येणाऱ्या अडचणींचा केलेला निर्देशही उल्लेख-नीय. मराठी गद्याला प्रौढ, संस्कृतप्रचुर वळण लावण्यात मे. कॅण्डीने घेतलेला पुढाकार सुपरिचितच आहे. 'ज्ञानो-दय'च्या संपादकांना त्याने लिहिलेले पत्र (क्र. ३४) त्याची या संबंधीची भूमिका स्पष्ट करते.

मराठी गद्याच्या या विकसनकालात बहुतेक सुशिक्षित महाराष्ट्रीयांचा खाजगी पत्रव्यवहार मात्र इंग्रजीतच चाललेला दिसतो. आप्तस्वकीयांना लिहावयाची पत्रेसुद्धा ही मंडळी इंग्रजीत लिहितात. टिळक–आगरकरांचा सारा पत्रव्यवहार इंग्रजीतच आहे. एवढेच नव्हे तर टिळकांनी पत्नीनिधनानंतर मंडालेहून धोंडूमामा विद्वांसांना लिहिलेले पत्रही इंग्रजीतच आहे.सावरकरांनी आपल्या बंधूंना लिहिलेली काही पत्रेही इंग्रजीत आढळतात. ही एक तत्कालीन शिष्टसंमत रूढीच असावी. शिष्ट-संकेतांची विविध वळणे मायन्यातूनही सूचित होतात.

–तसा–विचार करावयास बसल्यास 'विश्वग्र शारदे'तील पत्रातून आण-खीही पुष्कळ शोध–बोध निघण्यासारखा आहे. या पत्रांचे प्रत्येक अंगोपांग सतत काहींना काही सांगत–सुचवत राहाते. हे सांगणे–सुचविणे वाक्चातुर्याशी संबंधित नसूनही ते वाचकाला मराठी समाजाच्या व संस्कृतीच्या अंतरंगाचे अधिकारी बनविल्याशिवाय सोडीत नाही.

□ □ □

# एक मास्तर आणि एक पाटील

प्रा. गो. त्र्यं. कुलकर्णी

आम्हांला चारपाच जणांना त्या एकाकी जागी उतरवून पॅसेंजर गाडी पुढच्या रस्त्याला लागली. स्टेशनापासून तीन-चार मैलांवर ते गाव होते, पण दक्षिणेला की उत्तरेला याची आम्हाला खात्री नव्हती. चारपाच रस्ते फुटताना दिसत होते. त्यातला आमचा कोणता ते समजत नव्हते. पहाटेचा अंधार अजून मावळला नव्हता, नीटसे दिसूही लागले नव्हते. लांबवर सिग्नलच्या खांबापाशी एक शेकोटी पेटलेली दिसत होती. शेकोटी आहे का भट्टी आहे अशी धागधुग मनात होतीच. पण अंधारात भलत्याच रस्त्याला लागण्याऐवजी थोडी शिवीगाळ पत्करावी लागेल, शेकोटी असली तर थंडीचे निवारण होईल असा 'जितं वा...' छापाचा विचार करून तिकडे वळलो. रेल्वेच्या कोळशांची शेगडी छान फुलली होती. मालकाच्या जोडीला आमच्याच सारखे अवेळी उतरलेले एक दोन आणखीही पाव्हणे एव्हाना शेगडीभोवती टेकण्याच्या तयारीत होते. एका भल्या दांडग्या कुत्र्याचे स्वागत 'गीत' आणि मालकाची दबकावणी हा सलामीचा कार्यक्रम झाल्यावर 'टाईट पँट'च्या शिवणींचे स्मरण करीत त्या कोंडाळ्यात टेकलो. आम्हाला हवे होते त्या गावचे नाव काढल्याबरोबर यजमान आणि आधीचे पाव्हणे यांनी त्याच नावाला उपपदे लावीत, 'खुर्द' का 'बुद्रुक'? 'सोन' का 'मेथी'? असे प्रश्न पुढे टाकले. सुदैवाने ते ध्यानात होते. आणि पाव्हण्यांना रस्ता 'ठाव' होता! थंडीचे आणि आमच्या अज्ञानाचे निवारण करून मालकाला रामराम केला.

एव्हाना थोडेसे दिसू लागले होते. रस्ता चांगला रूंद, मुख्य म्हणजे स्पष्टपणे आखलेला होता. आमच्यापैकी एकाच्या गळ्यात पाण्याची मोठी किटली होती. चालू लागल्याबरोबर त्याचा 'डुबुक,' 'डुबुक' असा सारखा आवाज येऊ लागला. त्या तालावर आमचा 'संशोधन-मार्च' सुरू झाला. या नसत्या उद्योगात पडल्याबद्दल स्वतःला, अशा आडबाजूला मंदिरे उभारणाऱ्या त्या पूर्वजांना, आणीकही इतर बऱ्याच जणांना निरनिराळ्या कारणांनी 'विभूषणे' अर्पण करीत रस्ता तुडवायला आरंभ झाला. ही विभूषणे अवाच्य होती हे सांगणे नकोच. पहाटे साडेतीन वाजल्यापासून ऐन थंडीचा प्रवास करणारी मंडळी काय बोलतील हे सहज समजण्यासारखे आहे.

बराच वेळ गेल्यावर थोडया अंतरावर काही घरे दिसू लागली. त्याच्या आधी एक ओहोळ होता. तिकडील जागृत जनांची हालचाल डोळ्याआड करून पुढे चालली. आता खरा मोक्याचा क्षण होता. श्वानवृन्दाच्या 'स्वागताचे' कसे निवारण करावे याच्या युक्त्या एकमेकांना सुचवीत पुढे चाललो. 'अश्मयुगीन आयुधांचा प्रत्यक्ष वापर करून पाहण्याची ही संधी आली आहे' असे आमच्या ऐतिहासिक स्नेह्याने डिवचले. पण त्याला शांतता व सत्याग्रह या मार्गांवर प्रवचन द्यावयास लागल्यावर तो अक्षरश: 'दाती तृण धरून' शरण आला — त्याच्यापासल्या विडया केव्हाच संपल्या होत्या, चाळा म्हणून पेटीत शिल्लक असलेल्या काडया तो चावत होता!

गावात प्रवेश करते समयी विशेष काहीच घडले नाही (अपेक्षाभंग!) फार जुन्या मंदिराची माहिती मिळाली होती. प्रत्यक्षात त्यात काहीच तथ्य नव्हते. जे होते त्याचे फोटो घेतले, आराखडा उतरवा असे बरोबरच्या चित्रकाराला सांगून गावात 'चा'ची दुकान कुठे आहे या संशोधनाला निघण्याच्या बेतात होतो. एवढयात अंगावरची चादर सावरीत एक गडी सांगावा घेऊन आला, 'सरपंच बोलावन्यात.' 'आलोच' म्हटले आणि त्याच्या पाठोपाठ जाऊ लागलो.

पंचायतीचा व्हरांडा नीट साफसुफ केलेला, समोर सडा घातलेला. दारातच सरपंच उभे होते. रीतीप्रमाणे नमस्कार चमत्कार झाला. मुख्य खुर्चीत स्थानापन्न होत शेजारच्या तीनचार खुर्च्यांकडे हात करीत ते म्हणाले, 'बसा मंडळी, एवढी बातमी संपली की, बोलू सावकाशीने. तुम्हांलाही आजची ताजी बातमी कळेल.'

पूर्वी पंधरा होत्या त्याऐवजी आता दहा मिनिटेच बातम्या केल्याबद्दल 'आकाशवाणी'ला प्रथमच धन्यवाद दिले. हिंदीत वार्ता सुरू झाल्यावर मनात एक दुष्ट शंका आली. ती संपल्यावर इंग्रजीचा प्रवाह झाल्यावर ती खरी आहे याची खात्री झाली. तोही थांबला. सुगम गायन ऐकायलाच हवे. आणि मुख्य म्हणजे नंतर मराठी बातम्या. 'अरे गणपत, धरो एक दहा चहा सांग बरं — चहा घेता ना सगळे — हल्ली घेतातच म्हणा! मराठी बातम्या लावायलाच लागतात. ही आमची मंडळी जमतात त्यांना कळायला पाहिजे ना? अहो, हे चार ठिकाणचं ऐकतील, त्यांनला समजेल तेव्हा ते विचार करणार, पुढं येणार—' 'आऽऽकाशवाणी— बाकी सर्व अर्थातच गप्प. शेवटी एकदाच्या बातम्या संपल्या. रेडिओला गप्प करून गावच्या राजांनी मोहरा आमच्याकडे वळवला. कोठून आला, कशाला? याची मामुली चौकशी सुरू झाली.

—काय करता?

—डेक्कन कॉलेजात असतो.

—म्हंजे शिकवता म्हणा की.

—नाही, मुख्य काम इतिहास संशोधनाचे.

—ते झालं हो, पण कॉलेजातच ना?

—हो.

—मग मास्तर म्हणा की, हां जरा वरच्या मुलांचे, पण मास्तरच—

या वेळेपर्यंत आमचे वस्त्रहरण पूर्ण झाले होते, हल्ल्याची दिशा दुसरीकडे वळवायला हवी होती.

—बातम्या ऐकायला इतकी सगळी मंडळी रोज जमतात का ?

—तर हो, दोन्ही वेळेला. निदान रात्रीच्याला तर ठेवलेलीच की, आणि या आपल्या परवाच्या लढाईपासून लोकात जागृती फार, तुम्हांला वाटतं ही खेडेगावची माणसं, पण आम्ही सगळं ऐकतो, जमल तेव्हा वाचतो.

—शाळा वगैरे असेलच मोठी ?

—नाही हो, गावची वस्ती पाच-सातशेच्या वर नाही. इथं कशाचं हाय-स्कूल ? शेजारच्या गावाला जातात पोरं; पण ते खरं नाही. आपलं नावाचं.

—असं का म्हणता पाटील, तुमचे गावकरी इतके जागृत (आकाशवाणीच्या सौजन्याने) आणि शाळेवर इतका राग का ?

—मास्तर, खरं म्हणाल तर आमचा राग शाळेवर नाही; पण काय होतं, आमची चार पोरं असावी, एखाद्याला तरी चांगलं शिकवावं, तो घरदार पुढं आणील, असा विचार करून आम्ही त्याला शहरात ठेवणार. बोर्डिंगात ठेवणार, हा बी. एस्सी. होणार, बी. कॉम होणार, नाव काढणार, इकडं आमचे डोळे. पण तो हो इथं कशाला परततोय ? शहरात राहिला की तो इथं दोन दिवस टिकत नाही. इथे का सिनेमा का हाटेल का काय रंग आहे ? त्याची तंग पाटलूण, बुटाची चकमक, सगळं बिघडतं ना इथे. दिवाळीला आला तर चार दिवस कसेबसे काढतो, पण मग लगेच सांगतो, माझं कॉलेज सुरू आहे, अमकी चढाओढ आहे, तमकं शिबिर आहे—की चालला. घरची एवढी जमीन पडलीय. हा आमची 'शेतकी' सुधार-णार. आपला व्यवसाय सुधारणार म्हणून पहावं, पण याला ते गोड लागत नाही. तो बघतो कुठं बँकेत कारकुनी, मामलेदार कचेरीत कारकुनी नाहीतर शाळा कॉलेजात. मास्तरकी. काहीही चालेल, पण शहरात पाहिजे—गावाकडे परत यायचं नावच काढू नका.

—हां, ह्ये मात्र पाटील अगदी बरोबर सांगतात. अवं शिकलेलं प्वार परत दृिष्टी पडत नाही.

—मी सांगतो तुम्हांला. पोरगं एकदा शहरात गेलं की आमच्या गावाला मेलं. मी स्वत: बोर्डिंगात राहूनच शिकलो, पण परत गावाकडं आलो. आता तसं नाही. गावातली काही मुलं शिकतात, पण मग ती गावातली राहात नाहीत. तुमचं 'उच्च' शिक्षण एकीकडे आणि आमचा हा समाज दुसरीकडे.

नव्या अर्थव्यवस्थेने ज्या अनेक उला-ढाली घडवून आणल्या त्यात कुटुंब-संस्थेचे पूर्ण विघटन आणि ग्रामीण व नागरी या भागांची तीव्र फारकत या दोन महत्त्वाच्या. या दोन्हीमुळे उत्पन्न होणारे कमालीचे ताण, सुखदु:खे, या समंजस माणसाच्या तोंडून बाहेर पडत होती. त्याची व्यथा इतकी तीव्र की

# पार्क-डेव्हीसचा

# त्रिविध फायदे देणारा

# निको साबण

## इतर कोणत्याहि साबणापेक्षा तुमच्या त्वचेची अधिक काळजी घेतो

१ निको जंतूंचा नाश करतो

२ निको शरीराचा घामटपणा घालवितो

३ निको कातडी निर्मळ करून तिचे रक्षण करतो

निकोनें केलेले स्नान म्हणजे आरोग्यमान, नितळ कांतिकरिता घेतलेली परमावधीची काळजी! निकोच्या जंतुनाशक फेसामुळे कातडीवरील जंतूंचा नाश होतो आणि तिचे आरोग्य राखले जाते. निकोच्या औषधी गुणधर्मामुळें शरीराचा घामटपणा व दुर्गंधी दूर होतात. निकोच्या प्रभावी जंतुनाशक क्रियेमुळे कातडीच्या साधारण रोगांपासून रक्षण होते व त्वचा निर्मळ धुतली जाऊन ती तजेलदार, कांतिमान व टवटवीत होते. निको पुटकुळ्या व घामोळें यापासूनही रक्षण करतो. निकोच्या नियमित वापराने डोक्यांतील खवड्यापासून बचाव होतो. तुमच्या कातडीचा तजेलदारपणा व आरोग्य राखण्यासाठीं त्रिविध फायदे देणाऱ्या निकोचा वापर आजच सुरू करा.

TRIPLE ACTION

**NEKO®**

The Original Antiseptic Soap




**निकोची संवय लावून घ्या**

**आपल्या त्वचेसाठीं तो आवश्यक आहे**

® Regd. Trade Mark. Regd. Users—Parke Davis (India) Ltd., Bombay-72 AS.

कुटुंबविभाजनासारख्या गोष्टी अंगवळणी पडलेल्या ब्राह्मण समाजातील आमच्यासारख्यांना त्यातली आच जाणवावी. त्याची पोटतिडीक क्षणभर स्तिमित करण्यासारखी होती. पण ही नुसती सुरुवात होती. त्याच्या श्रद्धा व निष्ठा यांना फार खोलवर तडा गेला होता. व्यवसायामुळे थोड्या आडबाजूला पडलेल्या या माणसाचे निरीक्षण आणि आकलन किती अचूक होते याचे खरे प्रत्यंतर यापुढेच यावयाचे होते.

–आणखी सांगतो. ही माणसं आमच्यापासून दूर गेली. त्याची आम्हांला खंत वाटतेच. पण ही माणसातूनच दूर गेली आहेत हो मास्तर !

–काय ? आमच्या तोंडातून एकदमच प्रश्न बाहेर पडला.

- मास्तर दचकू नका. तुम्हांला दोनतीन गोष्टी सांगतो. हा पलीकडे मारुती बसलाय ना, पूर्वीचा हरिजन. याचा भाचा एस्. एस्. सी झाला आणि लगोलग कचेरीत नोकरीला लागला. काम काय याचे ? पगार वाटपाचे. ह्या मारुत्यासारख्या गावकामगाराचे वेतन कितीसे आहे ? शिवाय पूर्वीच्या पद्धतीमुळे याच्याच जातीची, नात्याची माणसं या कामावर आहेत. पण त्यांना पगार वाटताना हा त्यांच्यापुढे हात पसरतो की हो ! हा अगदी ग्रामीण जनतेत वाढलेला, त्या जनतेतलाच माणूस. पण त्याला हा विचार नाही, की मी माझ्या माणसाकडून कसा पैसा घ्यावा. सांगा, हा माणूस म्हणायचा का ? खरं सांगू मास्तर, ही एक निराळी जातच तयार झाली आहे.

स्वतंत्र जात ?

हो. सांगतो तुम्हाला. आम्ही काही फार शिकलेलं नाही पण भोवतालचं जग मात्र या डोळ्यांनी पहातो आहे. पलिकडे जिल्ह्याच्या गावी एका बँकेच्या शाखेत नवा मॅनेजर आला. शिकलेला, काम केलेला, शोधून सापडायला कठीण अशा प्रकारचा– प्रामाणिक. चार दोन महिने बँकेचे काम बघितले आणि सातआठ कारकून सस्पेंड केले. आता चौकशी चाललीय म्हणे त्यांची. सगळे बी. ए., बी. कॉम. झालेले. कारभारात गफलत करायचेच, पण शेतकऱ्यांना कर्ज मंजूर करायचं, त्यात पैसे मागायचे. जमल तर खायचे. सगळेजण आमचेच लोक. अहो त्यांना आमची स्थिती माहिती, त्यांना तरी आमची अडचण कळावी. नाही. आपली शान, चैन याच्यापुढे त्यांना मागल्याचा विसर पडला.

–बरे पैशाचं मागेपुढे करतायना, करा. तेही खपवून घेऊ एकवेळ. पण लेकोहो डिग्र्या लावतायना, त्याची तरी अक्कल आहे का ? याच बँकेत उमेदवार म्हणून बी. कॉम्. पोरं आली. प्रश्नं विचारला, 'ब्रिटनला कॉमन मार्केटमध्ये प्रवेश करायचाय तो कशासाठी ?' थोडा वेळ थांबून पठ्ठ्यानं उत्तर दिलं– 'मार्केट कमिटी जिल्ह्यातला सगळा व्यापार आपल्या हातात घेणार आहे म्हणून.' मी याच्यासाठी तळमळतो. अरे, शिकता म्हणजे काय करता तरी काय ? इथं खेड्यात बसून मला समज-

तंय आणि तुम्हांला कॉलेजात शिकून ही अक्कल !

मी लहानपणी बोर्डिंगात राहून शिकलो. तिथलं वातावरण निराळं होतं. काहीतरी काम करायचंय, आपल्या देशासाठी, आपल्या समाजासाठी असं सगळ्यांना वाटायचे. हां, आता एक होतं, तिथलं वळण थोडं सत्यशोधकी थाटाचं होतं. आम्ही तिथं ऐकायचे आणि आम्हांला तेच खरं वाटायचं – सगळं बिघडलंय ते बामणामुळे. तुम्हांला तोंडावर सांगतो. आम्हा जे वाटत होतं ते सांगायला लाज कसली. मास्तर, आता मात्र तसं वाटत नाही. आता कळतंय ते निराळंच. ही नोकरदारांची, चैनीला चटावलेल्या मंडळींची जातच निराळी. ही डोळ्याला सहज दिसणार नाही, पण मनाला खुपत राहते. तेव्हाचा बामण कारकून महाराला लाकडं फोडून द्यायला सांगायचा. आता आमचा हा महार कारकून महाराच्या पगारातलेच पैसे खायला बघतोय. एखादे वेळी वाटतं की कुणाकडनं काय खावं, त्याला झेपेलसा बोजा टाकावा हे त्या बामणाला कळत तरी होतं. पैसे देण्यापेक्षा कुऱ्हाडीचे दोन घाव घालणं महाराला सोपं होतं ! पण ही अक्कल आमच्या मारुतीच्या भाचराला नाही ना. चांगल्या वाईटाचे आमचे हिशोब चुकले. पण या लोकांना ते मांडायलाच नकोत. दुखणं समजलंय पण औषध सापडत नाही. बोला आता मास्तर, हे कसं सुधारणार ? ही नवी जात कशी मोडणार ?

मास्तर काय सांगणार ? सगळ्यांना माहिती असलेल्या जातीव्यवस्थेत मोठाले बदल घडत आहेत हे तज्ज्ञांच्या व्याख्यानांवरून तरी माहिती झाले होते, पण नवी जातिव्यवस्था उत्पन्न होत आहे याची त्याला कल्पनाच नाही. दगडाचे देऊळ समाधानकारक नाही म्हणून निराशा होतीच, त्यात समाजमंदिराच्या ह्या चित्राने आणखीनच भर घातली ! □ □ □


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी** (S. N.) पो. कतरी सराय (गया)

काळ्या सप्टेंबर संघटनेच्या कट्टर अरब गनिमांनी म्युनिच ऑलिंपिक स्पर्धात भाग घेणाऱ्या इस्त्रायली खेळाडूंवर अनपेक्षित हल्ला चढवून त्यांना कंठस्नान घातले. पहाटे ४-२० पासून रात्री १२-४५ पर्यंत प्रयत्नांची शिकस्त करूनही त्यांना वाचवणे कोणालाच शक्य झाले नाही. शेवटी ११ इस्त्रायली खेळाडू आणि पाच अरब गनीम प्राणास मुकले. अरब गनीमांच्या या कृष्णकृत्यामुळे ऑलिंपिक स्पर्धा आता काळ्या ऑलिंपिक स्पर्धा म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या आहेत....

# काळ्या ऑलिंपिक स्पर्धा

प्रताप पटवर्धन

काळाच्या उदरात काय दडले आहे हे कधीच कोणाला सांगता आले नाही आणि येतही नाही. तरीपण इतिहासाची पुनरावृत्ती होत असतेच. ज्या जर्मनीत हिटलर आणि नाझी सत्ताधीशांनी ज्यूंचे हत्याकांड केले त्याच जर्मनीत आज सुमारे तीस वर्षांनी ज्यू खेळाडूंवर निर्घृण हल्ला होऊन रक्तपात झाला. पण यावेळी नाझींच्याऐवजी पॅलेस्टाईन मुक्तीसेनेतील अतिरेकी अरबांनी हे कृष्णकृत्य केले. खिलाडूवृत्ती, मैत्रीभाव आणि स्वातंत्र्य या साऱ्या गोष्टींना त्यांनी तिलांजली दिली. जगातील सुमारे १२२ राष्ट्रे आपआपसातील हेवेदावे, द्वेषमत्सर, आर्थिक आणि राजकीय उच्चनीचतेच्या कल्पना विसरून खुल्या दिलाने एकत्र येऊन क्रीडांगणावर आपले सारे कौशल्य पणाला लावून एकमेकांवर मात करतात आणि तितक्याच खिलाडूवृत्तीने प्रतिस्पर्ध्यांच्या विजयाचे कौतुकही करतात.

म्युनिच येथील ऑलिंपिक स्पर्धांचा पहिला आठवडा अगदी सुरळीतपणे पार पडला. सारे कसे अगदी ठरल्याप्रमाणे होत होते. १९३६ साली बर्लिन येथील ऑलिंपिक स्पर्धात नाही म्हटले तरी हिटलरच्या हुकूमशाही आणि दडपशाहीचे प्रतिबिंब दिसत होते. एखादा निग्रो, ज्यू किंवा अनार्य खेळाडू विजयी होताच हिटलर त्याचा तिरस्कार करीत असे. पण दोन महायुद्धानंतर जर्मनीने पुनर्जन्म घेतला होता. एखाद्या तरुणासारखा या राष्ट्राचा उत्साह ओसंडत होता. कोणत्याही क्षुल्लक गोष्टींमुळेदेखील हिटलरच्या काळातील ऑलिंपिकची लोकांना चुकूनही आठवण होऊ नये म्हणून प्रत्येकजण प्रयत्न करीत

होता. पण एवढे होऊनही होणारे कधीही टळत नसते हे खरे.

५ सप्टेंबरची अगदी पहाटेची वेळ. खरे तर पहाट व्हावयासदेखील अजून बराच अवधी होता. ऑलिंपिक नगरी-भोवताली असलेल्या तारेच्या उंच कुंपणावरून उडी टाकून आत प्रवेश करण्याचा काही मंडळी प्रयत्न करीत होती आणि बहुतेक सर्वांच्या अंगावर 'ट्रॅक सूट' होता. शिवाय हातात बॅग्ज होत्या ही गोष्ट पहारेकऱ्यांनी पाहिली, पण जाणूनबुजून त्याकडे त्याने दुर्लक्ष केले. कारण बरेच खेळाडू रात्रीच्या वेळी ऑलिंपिक नगरीचे नियम धाब्यावर ठेवून रात्रीच्या वेळी मजा मारण्यासाठी गावात जात. मनसोक्त हिंडून फिरून, नाईट क्लबमध्ये मौज करून ही अशी मंडळी पहाटेच अशा तारेवरून उड्या टाकून परत आपआपल्या खोलीत हजर होतात. या गोष्टीची पहारेकऱ्यालाही माहिती होती. तेव्हा त्याच्या दृष्टीने ही नित्याचीच बाब होती. म्हणून त्याने या गोष्टीकडे संपूर्णपणे कानाडोळा केला. तारेचे कुंपण ओलांडून हे पॅलेस्टाईन गनिमी झपाट्याने जवळच्या एका इमारतीच्या आडोशाला आले. तेथे येताच त्यांनी प्रथम आपल्या हातातील बॅग्जमधून आपआपली शस्त्रे नीट जुळवून घेतली आणि तोंडाला काळा रंग फासला. आता हे सारे गनीम आपल्या मोहिमेसाठी सज्ज झाले होते आणि ३१ नंबरच्या इमारतीकडे त्यांनी आपला मोर्चा वळविला. कारण याच इमारतीत दुसऱ्या मजल्यावर २२ इस्राइली खेळाडू त्यांचे शिक्षक आणि क्रीडा अधिकारी उतरले होते. अरब गनीम लपत-छपत या इमारतीपाशी आले आणि जय्यत तयारीनिशी त्यांनी ज्या मजल्यावर इस्राएली खेळाडू उतरले होते तेथपर्यंत मजल मारली. सारे कसे ठरल्याप्रमाणे सुरळीत पार पडत होते. तरीदेखील खात्री करून घेण्यासाठी त्यांनी एका खोलीचे दार ठोठावीत अस्खलित जर्मन भाषेत विचारले, 'इस्राइली खेळाडू येथेच उतरले आहेत ना?' पहाटे ४–२० वाजता आपल्या खोलीचा दरवाजा कोण वाजवतोय असे म्हणतच इस्राइली संघातील कुस्ती आणि शारीरिक शिक्षणाचे शिक्षक मोशे बेनबर्ग (वय ३२) यांनी दरवाजा अर्ध-वट उघडून पाहिले. तर काय तोंडाला काळा रंग लावलेले, अंगावर बुरखा घेतलेले शस्त्रधारी अरब गनीम. मोशे बेनबर्गने चटकन ओळखले, की हा अरब गनिमांचा हल्ला आहे. त्याने पटकन दरवाजा लावला आणि दाबून धरला आणि ओरडून म्हणाला, 'अरे पळा, अरब गनिमांनी हल्ला केला आहे.' मोशे बेनबर्गच्या तोंडून हे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच अरब गनिमांनी मशीन-गनची गोळ्यांचा वर्षाव केला दरवाजा फोडून मशीनगनच्या गोळ्या मोशे बेनबर्गच्या अंगात घुसल्या. पण त्याच खोलीत झोपलेला गॅड झॅबरी हा मुष्टी-योद्धा जागा झाला आणि त्याने हाताने खिडकीचे तावदान फोडून तो पली-कडच्या खोलीत पळाला. मोशे बेनबर्ग खाली कोसळताच अरब गनिमींनी लगेच

आपल्या पत्नीसमवेत बेनबर्ग



बेनबर्गचा गेल्याच वर्षी विवाह झालेला होता

दुसऱ्या खोलीकडे कूच केली. त्या खोलीत असलेल्या दणकट कुस्तीगीरांनी हातात सुरा घेऊन सशस्त्र अरब गनिमांवर हल्ला चढविला. पण दुसऱ्याच क्षणी गोळ्यांचा वर्षाव आणि मॉर्टरगनचा जबरदस्त गोळा लागल्याने योसफ रोमानोसारखा तगडा जवान जमीनदोस्त झाला. हे होत असतानाच इस्राइली राहात असलेल्या खोल्यातून एकच गोंधळ उडाला. अचानक झालेल्या हल्ल्याने कोणालाच काही सुचेना. त्यातून मोशे वेनबर्ग आणि योसफ रोमानोसारखे खंदे पुरुष धारातीर्थी पडलेले पाहिल्यावर तर इतरांची स्थिती विचित्र झाली. पण अशा कठीण परिस्थितीतदेखील स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता योसफ गोटफाऊंट हा ६ फूट १ इंच उंचीचा २४० पौंड वजनाचा भीमकाय पुरुष छाती पुढे काढून सरसावला. अंगावर चालून येणाऱ्या सशस्त्र अरब गनिमांची पर्वा न करता पुढे येऊन त्याने झटकन दरवाजा बंद केला आणि ओरडून इतरांना बाहेर पळून जाण्यास सांगितले. दरवाजा, खिडकी दिसेल त्या मार्गाने इतर खेळाडूंनी पळ काढला. एकूण २७ पैकी १८ जण सलामीत बाहेर पडले. योसफ गोटफाऊंट एकटा किती वेळ दरवाजा दाबून धरू शकणार होता. बाहेरून आठ अरबांनी अखेरला दरवाजा उघडावयास भाग

पाडले आणि मशीनगन्स रोखून उरलेल्या ९ इस्राएली खेळाडूंना ताब्यात घेतले. प्रथम त्यांनी कासऱ्याने हात मागे बांधले. मग एकमेकांचे हातपाय बांधून गाठोडे बांधले आणि एका बिछान्यावर साऱ्यांना ठेवले.

इकडे सुटून बाहेर पडलेल्या इतर खेळाडूंच्या आणि मशीनगनच्या आवाजाने त्याच इमारतीतील इतर देशाचे खेळाडू बाहेर आले आणि पाठोपाठ जर्मन पोलिसांनी त्या सर्व इमारतीला वेढा दिला. सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पोलीस प्रमुख यॅनफ्रेड स्त्रिबर यानी ६०० सशस्त्र पोलिसांसह ३१ नंबर इमारतीभोवती गराडा घातला. इमारती जवळचा २२० यार्डांच्या प्रदेशात आता पोलिसांचे राज्य होते. त्यामुळे अरब गनीम यातून निसटून जाणे कठिण होते पण खरा प्रश्न होता तो त्याच्या ताब्यात असलेल्या ९ इस्त्राइली खेळाडूंच्या जीविताचा त्यांना अरब गनीमाच्या ताब्यातून सहीसलामतपणे कसे सोडवायचे ? यावर बराच विचार होऊन शेवटी पोलिसप्रमुख मॅनफ्रेड स्त्रिबर धैर्याने पुढे झाले आणि ज्या भागात अरब गनीमांनी तावा मिळविला होता तेथे गेले तो व्हरांड्यात एक सडपातळ तरुण डोक्यावर पांढरी टेनिसची हॅट आणि डोळ्यावर मोठ्या कांचा असलेला गॉगल लावून मोठ्या दिमाखात उभा होता. मॅनफ्रेड स्त्रिबर त्याच्या जवळ जाताच त्या तरुणाने त्यांना प्रश्न केला. 'तुम्ही मला पकडू इच्छिता का ?' असे बोलताना त्याने आपले दोन्ही हात लांब पसरले तेव्हा मॅनफ्रेड स्त्रिबर याच्या लक्षात आले की त्या तरुणाने आपल्या हातात हात बॉम्ब ठेवला असून कोणत्याही क्षणी तो सारे काही उध्वस्त करून टाकेल. म्हणून स्त्रिबर यांनी शांत चित्ताने त्याला त्यांच्या मागण्याबद्दल विचारणा केल्यावर तो तरुण म्हणाला 'मीच या टोळीचा नायक आहे आणि आम्ही आमच्या मागण्या ९ वाजता तुम्हाला कळवू.' सुमारे अर्धाच तीन तासानंतर का होइना पण विचार करण्यास काहीतरी वेळ मिळाला म्हणून स्त्रिबरनी या गोष्टीस होकार देऊन ते तेथून परत आले.

एकीकडे सशस्त्र पोलीस. निष्णात नेमबाज ३१ नंबर इमारतीच्या जवळ पासच्या इमारतीवरच्या गच्चीतून आणि छपरावरून अरब गनीमावर दबा धरून बसले होते. पोलिसप्रमुख मॅनफ्रेड स्त्रिबर, प. जर्मनीचे मंत्री गेनस्वर यांची वरच्या पातळीवर हा प्रश्न सोडवावा किंवा काय याबाबत बोलणी चालू होती. तर या घटनास्थळापासून अवघ्या ४०० यार्डावर असलेल्या मैदानावर प. जर्मनी आणि जपान यांचा व्हॉलीबॉलचा सामना पाहण्यात सुमारे २ हजार प्रेक्षक रंगले होते. तर सेंट्रल प्लाझा या नजीकच्याच इमारतीत काही खेळाडू पींगपाँग खेळण्यात गर्क झाले होते. अर्थात अरब गनीमानी इस्त्राइली खेळाडूवर हल्ला केल्याचे



हल्ल्यातील बळी
फ्रिडमन, बर्गर, रोमानो

वृत्त समजताच साऱ्या ऑलिंपिक नगरीवर एकप्रकारची अवकळा पसरली. ६ वा. ३५ मिनिटांनी म्युनिचमधील घटनेची बातमी प. जर्मनीचे चॅन्सेलर विली ब्रँट यांना कळविण्यात आली ही बातमी कळताच त्यांनी तात्काळ म्युनिचकडे धाव घेतली.

अरब गनीमांनी इस्त्राएलच्या ताब्यात असलेल्या २०० अरब गनिमांची तावडतोब सुटका करावी अशी मागणी केली आणि दुपारी १२ पर्यंत मागणी मान्य न केल्यास आपल्या ताब्यात असलेल्या इस्त्राइली खेळाडूतील एक एक जण प्रत्येक अर्ध्या अर्ध्या तासाने मारण्यात येईल असे एका पत्रकाद्वारे कळविले.

अरब गनिमांची ही मागणी त्वरीत इस्त्राएलच्या पंतप्रधान श्रीमती गोल्डामेयर यांना कळविली आणि त्यांनी तातडीची मंत्रीमंडळाची बैठक बोलविली. संरक्षणमंत्री मोशेदायेन आणि इतर वरिष्ठ मंत्री बैठकीस हजर होते पण अरब गनिमांची मागणी सर्वांनी एकमताने फेटाळून लावली. इकडे म्युनिचमध्ये दु. १२ वाजून गेले परत अरब गनिमांच्याकडून आणखीन मुदत वाढवून घेतली गेली ही बातमी जेव्हा इस्त्राएली रेडिओने दिली तेव्हा संरक्षणमंत्री मोशेदायेन अस्वथपणे खोलीत सारखे येरझाऱ्या घालीत होते. मध्ये

खिडकीजवळ थांबून त्यांनी शून्य नजरेने आकाशाकडे पाहिले आणि परत येरझाऱ्या घालणे सुरू झाले. इतक्यात पंतप्रधान गोल्डामेयर तेथे आल्या आणि अगदी खालच्या आवाजात म्हणाल्या ' मला फार दुःख होत आहे की, आपले बर्गर, गोरफाऊंड हालफीन, आणि मार्क स्लाव्हिन सारखे अगदी तरुण उमदे खेळाडू अडकले आहेत.

डेव्हिड बर्गर इतके वर्षे अमेरिकेतच होता कायद्याची पदवी मिळविल्यावर गतवर्षीच तो इस्त्राएलमध्ये आला होता. अवघा २६ वर्षाचा हा तरुण, योसेफ गोरफाऊंड सारखा भीमकाय, कुस्तीचा पंच वेतवर्ग आणि रोमानो सारखे तगडे खेळाडू आंद्रे स्पिटझरसारखा निष्णात तलवार बाज आणि अरेरे बिचारा मार्क स्लाव्हिन सारखा अवघा १८ वर्षाचा कोवळा कुस्तीगीर पण कमालीचा राष्ट्रप्रेमी. अवघ्या तीन महिन्या पूर्वीच त्याच्या आग्रहाने त्याचे सर्व कुटुंबिय रशियातून इस्त्राएलमध्ये स्थायिक होण्यासाठी आले होते. मार्क स्लाव्हिनला सारखे वाटे की आपण देशासाठी काहीतरी करावे आणि म्हणूनच तो रशिया सोडून इस्त्राएलला आला होता. बिचाऱ्याला रशियनखेरीज दुसरी कोणतीच भाषासुद्धा येत नाही. अरब गनीमानी त्याला काय विचारलंय हे सुद्धा सांगता येणार नाही अगदी मुक्या प्राण्यासारखी त्याची स्थिती झाली...

काहीही असले तरी इस्त्राएल अरब गनीमांच्या मागण्या मुळीच मान्य करणार नाही. एकदा जर का भावनेच्या आहारी जाऊन त्यांची मागणी मान्य केली तर त्यांना प्रोत्साहन दिल्यासारखे होईल. अगदी हृदयावर धोंडा ठेऊन कठोरपणे त्यांच्या मागण्या ठोकरून देण्यातच देशाचे हित आहे. प्रतिष्ठा आहे.

पंतप्रधान गोल्डा मायर यांनी आपला निश्चय कायम ठेऊन अरब गनीमांची मागणी धुडकावून लावली.

मधल्या वेळात जर्मन अधिकारी आणि मंत्र्यांनी स्वतः ओलीस राहावयास तयार असल्याचे अरब गनीमांना सांगून पाहिले पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही शेवटी स्वतः विली ब्रॉटनी रात्री ८·३० वाजता इजिप्तचे अध्यक्ष अन्वर सादत यांच्याशी संपर्क साधण्याचा कसून प्रयत्न केला पण अध्यक्ष सादत त्या वेळी बैठकीत असल्याने पंतप्रधान अझीझ सिद्दीकी यांच्याशी त्यांनी बोलणी केली. अरब गनीमांचे मन वळविण्याची विनंती केली. पण ब्रॉट यांच्या प्रयत्नाला यश आले नाही. अझीझ सिद्दिकी यांनी आपला गनिमांशी काडीचाही संबंध नाही आणि याबाबत आपण काहीही करू शकत नाही असे सांगून हात झटकून टाकले.

प. जर्मनीच्या अधिकारी आणि मंत्र्यांचे हे सारे प्रयत्न चालू असताना अरब गनिमांच्या प्रमुखाने आपल्या खोलीतूनच मध्यपूर्वेतील आपल्या संघटनेच्या कार्यकर्त्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण काहीच जमेना म्हणून त्यांनी लेबानेन येथील फेदायीन या

आपल्या संघटनेच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांशी बोलण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ आणि आश्चर्य म्हणजे फेदायीन संघटनेच्या कार्यालयातून या अरब गनिमांना अतिशय तुसडेपणाची उत्तरे मिळाली. जणू काही अरब गनिमांना कोणीच ओळखीत नव्हते. फेदायीन संघटनेच्या या अशा तुटक वागणुकीमुळे अरब गनिमांची डोकी आणखीन भडकली. ज्यांच्यासाठी आपण प्राणाची आहुती देऊन आत्मनाश करीत आहोत ते लोक आपणांस जवळ करत नाहीतच उलट झिडकारून टाकत आहेत.

प. जर्मन अधिकारी आणि मंत्र्यांची मन:स्थिती अशीच विचित्र झाली. इकडे इस्त्राएलने अरब गनिमांच्या मागण्या धुडकावून लावल्या तर इजिप्तने त्यांच्याशी आपला काहीही संबंध नाही असे सांगून टाकले. अरब गनिमांना वाटेल तेवढे पैसे देऊ केले. इतकेच नव्हे तर स्वत: जर्मन अधिकाऱ्यांनी ओलीस राहावयाची तयारी दर्शविली. कोणीच कोणाचे ऐकेना. बिचाऱ्या इस्त्राएली खेळाडूंचा मात्र जीव क्षणाक्षणाला जात होता.

काहीच घडत नाही असे पाहून अरब गनिमांनी त्यांना इस्त्राएली खेळाडूंसह देशाबाहेर विमानाने जाण्याची व्यवस्था करावयास सांगितले. जर्मन अधिकारी इस्त्राएली खेळाडूंना देशाबाहेर नेऊन द्यावयाचे नव्हते. शेवटी नाईलाज म्हणून त्यांनी अरब गनिमांची अट मान्य केली. पण त्यावरोबरच शेवटचा आणि निर्धाराचा प्रयत्न म्हणून म्युनिच नजीकच्या विमानतळावर विमानात चढताना अरब गनिमांना आपल्या निष्णात नेमबाजानी अचूक टिपावयाचे असे ठरवून टाकले.

भुयारी मार्गाने एका बसमधून ९ इस्त्राएली खेळाडूंची गाठोडी आणि पाच अरब गनिमांना हेलीकॉप्टर तळापर्यंत आणले तेथून दोन हेलिकॉप्टरमध्ये अरब गनीम आणि इस्त्राएली खेळाडू होते तर तिसऱ्या हेलिकॉप्टरमध्ये जर्मन अधिकारी आणि दोन इस्त्राएली गुप्तहेर होते. रात्री १० वाजता हे सारे लोक फ्रुस्टेन फिल्डवर्क या विमानतळाकडे निघाले. फ्रेस्टेनफिल्डबर्क विमानतळावर लुफतांझाचे ७२७ बोईंग विमाग तयार ठेवण्याची व्यवस्था केली होती आणि त्याचवरोबर विमानतळाभोवताली ५०० सैनिकांनी गराडा घातला होता. शिवाय ५ निष्णात नेमबाज बदुका घेऊन सज्ज होते. तसेच विमानतळावरील टॉवरहाऊसमध्ये देखील सशस्त्र सैनिक बसविले होतेच. या सर्वांना सूचना देण्यात आल्या होत्या, जेव्हा पाचही अरब गनीम हेलीकॉप्टरमधून उतरून ७२७ बोईंग विमानात चढू लागतील तेव्हाच बंदूकीने त्यांना अचूक टिपावयाचे.

१० वाजून ३५ मिनिटानी हेलिकॉप्टर्स विमान तळावर आली. सारे सज्ज होते इस्त्राएली खेळाडूंना या यमदूताच्या तावडीतून सोडवायची ही अखेरची संधी होती. सर्वत्र भयाण शांतता पसरली होती. अंधारात काहीच दिसत

नव्हते. विमानतळावर नेहमी सारखे भरपूर दिवे दिसत नव्हते. हेलिकॉप्टर्सच्या पंख्याची फडफडपण आता थांबली. त्यामुळे शांतता देखील भेसूर वाटू लागली होती. दबा धरून बसलेले नेमबाज अंधारातून काहीतरी दिसावे म्हणून डोळ्याची पापणी देखील मिटू द्यावयास तयार नव्हते. सारे श्वास रोखून क्षणाक्षणाची वाट पाहात होते. इतक्यात हेलिकॉप्टरचा दरवाजा उघडल्याचा आवाज झाला आणि—आता पुढे काय होणार याची प्रत्येकजण वाट पाहू लागला. अरब गनिमांचा म्होरक्या पुढे झाला आणि त्याने विमानाची तपासणी करावयास सुरुवात केली. त्याच्या बरोबर आणखी एक अरब गनीम खाली आला आणि या दोघांनी विमानाची तपासणी पूर्ण केली. नतर आपल्या साथीदारास इस्राएली खेळाडूस विमानाकडे आणावयास सांगितले. तेव्हा आणखीन दोन अरब गनीम खाली उतरले आणि इस्राएली खेळाडूंना उतरवू लागले त्या वेळी पहिल्या दोघांनी बोईंग ७२७ विमानाच्या दोन वैमानिकांना आपल्यापुढे उभे करून त्यांचा ढाली-सारखा उपयोग करून घेतला विमान-तळावर आता पाचापैकी चौघे होते अजून एक जण हेलिकॉप्टरमध्येच होता तो खाली येताच त्यांना अचूक टिपावयाचे ठरले होते. पण तो काही उतरेना आणि कदाचित ही आलेली संधी देखील वाया जाईल का काय? अशी भीती वाटू लागली आणि सूं सूं करणाऱ्या गोळीने एक अरब गनीम टिपला आणि त्याच्या पाठोपाठ गोळ्यांचा वर्षाव झाला. तीन अरब गनीम मारले गेले पण त्यांच्या म्होरक्याने चित्त्याच्या वेगाने हेलिकॉप्टरच्या दिशेने झेप घेतली आणि क्षणार्धात त्याने हेलिकॉप्टरचा दरवाजा बंद करून घेतला आणि त्याच्या हातातील मशीनगन आग ओकू लागली विमान तळावरील आणि टॉवर हाऊसमधील दिवे त्यामुळे फुटले शिवाय एक जर्मन पोलिस कामास आलाच अंधारात बंदूकीच्या गोळीच्या प्रकाशा व्यतिरिक्त काहीच दिसत नव्हते. अरबगनिमांच्या म्होरक्याने हातबॉंब फेकला तो नेमका दुसऱ्या हेलिकॉप्टरवर. जवळ जवळ दीड-दोन तास विमान तळाला रणांगणाचे स्वरूप आले होते.

इकडे म्युनिच आणि ऑलिंपिक नगरीत वृत्त आले, की विमान तळावरील गोळीबारात सर्व अरब गनीम ठार होऊन इस्राएली खेळाडूंची मुक्तता झाली आहे. आणि सर्वत्र कोण आनंदी आनंद? म्युनिच आणि ऑलिंपिक नगरीत नव्हे तर जर्मनीत हे वृत्त पसरले आणि विजयोत्सव सुरू झाला. शॅंपेन, व्हिस्की, एक ना अनेक प्रकारच्या बाटल्या सारख्या फुटत होत्या.

हेच वृत्त इस्राएली रेडिओवरून दिल्याने देशभर आनंदोत्सव सुरू झाला. सगळीकडे उत्साह ओसडत होता. सारे कसे कल्पकथेप्रमाणे झाले होते पण हे सारे फारकाळ टिकले नाही. ते केवळ क्षणभंगुर स्वप्न ठरले. सुमारे तीन तासानंतर जर्मन अधिकाऱ्यांनी अरबगनीमाबरोबर सर्वच्या सर्व इस्राएली

खेळाडू ठार झाल्याची बातमी अगदी कठोर अंत:करणानी दिली. जर्मनी आणि इस्त्राएल बरोबर सर्व जग हा नाटयपूर्ण शोकांत ऐकून हळहळले. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही या चित्तथरारक घटनेचा शेवट कोणीही बदलू शकला नाही.

□ □ □

## ब्लॅक सप्टेंबर

ब्लॅक सप्टेंबर ही दहशतवादी घातपाती कृत्ये करणारी संघटना सर्व अरब गनीमी संघटनांपेक्षाही कडवी समजली जाते. किंबहुना याचे सभासद देखील अतिरेकी समजले जातात. १९७० मध्ये जॉर्डनचे राजे हुसेन यांनी दहशतवादी पलेस्टाईन गनिमांविरुद्ध मोहीम उघडली कारण या गनिमांना आपल्या देशात आश्रय दिल्याने इस्त्राएली विमानांनी सतत बाँबफेक सुरू केली होती. आणि म्हणूनच राजे साहेबांनी गनिमांना आश्रय न देण्याचे ठरविले. तेव्हाच ब्लॅक सप्टेंबर या कडव्या संघटनेची स्थापना झाली. फेदायीन या मुख्य संघटनेची ब्लॅक सप्टेंबर एक शाखा आहे. अल फताह' अल रशीदसारख्या मातब्बर गनीमी संघटना आहेत पण फेदायीन आणि ब्लॅक सप्टेंबरसारख्या अतिरेकी संघटनांना त्यांच्याकडून फारशी मदत होत नाही. जॉर्डनने तर त्यांना मुळीच थारा दिला नाही. बरे इतर अरब राष्ट्रांकडून मिळणारी मदतही अगदी तुटपुंजी, त्यामुळे काही फेदायीन प्रमुखांनी नाईटक्लब आणि लॉंड्रीज सुरू केल्या आहेत. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये या ब्लॅक सप्टेंबरच्या गनिमांनी कैरो येथे जॉर्डनचे पंतप्रधान वासफी तेलावर हल्ला करून त्यांना ठार केले. का तर ते अरब इस्त्राएल समझोत्याला तयार होते. त्यानंतर त्यांनी प. जर्मनीतील पाच जॉर्डनी नागरिकांना ठार केले. ब्लॅक सप्टेंबरच्या माहितीनुसार हे लोक इस्त्राइलसाठी हेरगिरी करीत होते. मे महिन्यात जपानांच्या मदतीने त्यांनी तेल अविव्ह येथील विमानतळावर हल्ला चढविला होता. इस्त्राएली गुप्तचरांच्या माहितीनुसार ब्लॅक सप्टेंबर म्हणजेच अल फताह संघटनेची उपशाखा आहे. या संघटनेचे सभासद सुमारे ४०० ते ६०० असून ते एकाच ठिकाणी कधीच राहत नाहीत. ते सारखे एका ठिकाणाहून दुसरीकडे जात असतात. पण याची मुख्य कचेरी बैरूत येथे असून या संघटनेचा कोणताही ध्वज, मानचिन्ह, किंवा खूण नाही. इस्त्राएलवर संधी मिळेल तेथे, हल्ला चढवावयाचा. त्याचा रोख विशेषत: विमाने, इस्त्राएली राजकीय पुरुष, शास्त्रज्ञ, गुप्तहेर आणि खेळाडू यांच्यावर दिसून येतो.

□

धी गोवा हिंदु असोसिएशनने
सादर केलेले

# बिऱ्हाड बाजलं

सौ. पुष्पा भावे






खरं म्हणजे 'धी गोवा हिंदु असोसिएशन'चे 'बिऱ्हाड बाजलं' हे नाटक रंगभूमीवर येऊन खूप दिवस झाले. ते लोकप्रिय होऊन त्याचे दौरेही जोरात होऊ लागले तरी ते बघण्याचा योग आला नव्हता आणि ज्या दिवशी योग आला तो योगायोगाने वेगळा प्रयोग ठरला; कारण त्यातील मुख्य स्त्री भूमिका सौ. दया डोंगरे यांनी केली नव्हती; त्या प्रयोगापुरते ते काम सौ. ललिता केंकरे यांनी केले होते.

श्री. रत्नाकर मतकरी गेली दहा-बारा वर्षे नाट्यलेखन करीत असले, बालरंगभूमी आणि एकांतिका या संदर्भात त्यांचे नाव मराठी रंगभूमीवर स्थिर झालेले असले, तरी त्यांची संपूर्ण नाटके व्यावसायिक रंगभूमीवर येत नव्हती. श्री. आत्माराम भेंडे यांनी 'माझ्या बायकोचा मुलगा' हा मतकरींचा फार्स दोन वर्षांपूर्वी सादर केला होता; परंतु तो अपयशी ठरला होता. यंदा 'नाट्यसंपदे'ने रंगमंचावर आणलेले 'अंधार माझा सोबती' हे त्यांचे रूपांतरित नाटक मात्र फार यशस्वी ठरले आहे. त्यापाठोपाठ श्री. दामू केंकरे मतकरींचे नवे विनोदी नाटक सादर करणार ही वार्ता आल्यावर उत्सुकता निर्माण झाली. विशेषत: श्री. माधव वाटवे, श्री. दत्ता भट, सौ. शांता जोग, कु. मीना सुखटणकर ही नटमंडळींची नावे ऐकल्यानंतर या नव्या नाटकाविषयी विशेष अपेक्षा निर्माण झाल्या होत्या.

'बिऱ्हाड बाजलं,' हे श्री. मतकरींचे नाटक म्हणजे 'Apartment' चे मराठी रूपांतर आहे. पूर्वी 'एकटा जीव सदाशिव' या नावाने सरकारी स्पर्धेत ते सादर केले होते. या नाटकाचा स्वभाव सध्या मराठी रंगमंचावर केल्या जाणाऱ्या फार्सपेक्षा वेगळा आहे. ही

एका साध्याभोळ्या जीवाची आणि त्याच्या सखीची कहाणी आहे—विनोदाकडून मंद कारुण्याकडे जाणारी! अनेकांच्या मनामध्ये 'Apartment' या चित्रपटाची स्मृती आजही असेल. त्यात विनोद आणि कारुण्य यातील तोल नेमका साधला गेला होता. नाटकाचा हा स्वभाव लक्षात घेता श्री. माधव वाटवे यांची प्रमुख भूमिकेसाठी निवड अगदी अचुक वाटली. 'ससा आणि कासव' या नाटकातील विनोदाची जात वरीलप्रमाणेच असल्यामुळे श्री. वाटवे पुन्हा एकदा जाणकार अभिनयाचा प्रत्यय देतील असे वाटले होते.

या सर्व उंचावलेल्या अपेक्षा घेऊन 'विन्हाड वाजलं' या नाटकाचा प्रयोग पाहिला तेव्हा बरीच निराशा झाली. संपूर्ण प्रयोगाचा परिणाम तीव्र कधीच झाला नाही. कदाचित मी पाहिलेल्या प्रयोगात आयत्या वेळी सौ. ललिता केंकरे यांनी काम केले होते त्यामुळे संपूर्ण नटसंघाच्या प्रतिक्रिया विचलित झालेल्या असतील. श्री. दामू केंकरे यांच्या दिग्दर्शनात एरवी आढळणारा बंदिस्तपणाही या नाटकात जाणवत नाही. तरी सर्वच नटनटींनी अभिनयाने या नाटकाचा प्रयोग सावरला आहे.

श्री. माधव वाटव्यांचीच असणारी भूमिका सादर करतानाही श्री. वाटवे काहीसे अस्वस्थ वाटत होते. याचे कारण कदाचित लेखनातील, विशेषत: तिसऱ्या अंकातील ठिसूळपणात असावे. श्री. दत्ता भट यांना पुष्कळ दिवसांनी वेगळी भूमिका या नाटकात लाभली आहे. नायकाच्या तीन मालकांचे काम एकटचा दत्ता भटांनी सादर केले आहे. दिग्दर्शकाने (वा लेखकाने) संकल्पिलेली ही भूमिका नाटचवस्तूला उपकारक ठरली आहे. त्या प्रत्येक मालकाचे व्यसन वेगळे असले तरी प्रवृत्ती एकच आहे, हे श्री. भटांनी तिन्ही भूमिका करण्यातून नेमके प्रस्थापित झाले. श्री भट यांनी चाणाक्षपणे वेगवेगळचा लकबी, आवाज योजून तीन व्यक्तिमत्त्वे व्यक्त केली.

सौ. शांता जोग यांनी, आज व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी ठरलेल्या त्यांच्या भूमिकांपेक्षा एक निराळी भूमिका स्वीकारली याबद्दल त्यांचे अभिनंदनच करावयास हवे. त्यांनी काळजी घेतली नाही तर त्यांच्या आवाजाचा विशिष्ट झोका त्यांच्या सर्व भूमिकांना एकसुरी करणार आहे. सौ. केंकरे यांनी सावधतेने प्रसंग साजरा केला; अगदी भावगीतासह. काही स्थळी त्यांच्या स्मरणशक्तीला पडणारा ताण जाणवत होता; तरी त्या सहजतेने वावरल्या. या नाटकात विशेष उल्लेख करायला हवा कु. मीना सुखटणकर या तरुण अभिनेत्रीचा. लहानशा भूमिकेतही आपल्या सहज, अल्लड अभिनयाने त्यांनी रंग भरला. (जाता जाता एक लहानसा तपशील: मराठी रंगभूमीवर सामाजिक नाटकातील वेशभूषेचा फारसा विचार केला जात नाही. सौ. विजया मेहता, सौ. सुलभा देशपांडे यांचा अपवाद वजा

करता, नायिका बहुधा चांगली झुळ-झुळीत पातळे वापरताना दिसतात. त्यामागे विचार क्वचित असतो. कु. सुखटणकर यांनी स्वत:साठी निवडलेल्या साड्या सुती होत्या; परंतु त्यावरील वैशिष्ट्यपूर्ण आकृतीरचना, त्यांचे रंग यामुळे उपनायिकेचा अल्लड स्वभाव सहजपणे व्यक्त झाला आणि नाटकाच्या दृश्यपरिणामाला सुखद हातभार लागला).

श्री. दामू केंकरे, श्री. नारायण पै यांनी आपल्या नेहमीच्या कार्यक्षमतेने अभिनय केला. श्री. नाईक यांचा अभिनय घरमालकाला साजेसा असला तरी त्यांचा अनेक नाटकातला अभिनय पाहता ते फारच सांकेतिक अभिनयाचा, केवळ आपल्या शरीरयष्टीचा वापर करताना दिसतात.

नायिकेच्या भावाचे–गुंडाचे तिसऱ्या अंकातील पात्र अनावश्यक व भडक वाटते. झोपेच्या गोळ्यांचा परिणाम होऊ नये म्हणून प्रेयसीला चालवताना 'आनंदी आनंद गडे' म्हणणे यातील सूक्ष्म कारुण्य, पुढील बटबटीत रचनेमुळे नाहीसे होते.

'वाजे पाऊल आपुले' अथवा 'घेतलं शिंगावर' या नाटकाशी तूलना करता 'बिऱ्हाड बाजलं' हे नाटक फिके वाटते, तरी आज रंगमंचावर येणाऱ्या द्रुतगतीच्या भडक फार्सपेक्षा अधिक सुसह्य वाटते. श्री. मतकरींची पदरचना रसपूर्ण आहे. (परंतु ते सरल अर्थाचे पद पार्श्वसंगीतात रसिकांपर्यंत पोचत नाही) एकच शंका मनात येते : केवळ विनोदी वा रहस्यपूर्ण नाटकेच धंदा करतात अशी मराठी रंगभूमीची अवस्था उद्या होणार नाही ना?

□ □ □


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

# सीमाबद्ध

## अनंत आमुची ध्येयासक्ती

देवीदास बागूल

**पडदा**

कलकत्त्यातल्या सुशिक्षित बेकार तरुणांची गोष्ट आपण समजू शकतो. ते बिचारे एम्प्लॉयमेंट एक्सचेंजच्या ऑफिसजवळच रेंगाळत असतात यात काही वावगे नाही त्यांना मुळी अजून अनंत क्षितिजाकडे झेपावण्यासाठी दिशाच सापडलेल्या नसतात.

पण श्यामलेंदूबाबूची तर गोष्ट तशी नव्हती ना ?

'सीमाबद्ध' चित्रपटाची सुरुवात येथूनच होते.

श्यामलेंदू उच्चविद्याविभूषित आहे. त्याला परदेशी कंपनीत चांगली नोकरी मिळाली आहे. सेल्स मॅनेजरची. पंखे आणि दिवे विकायचे. आता काय कमी आहे ? कंपनीने दिलेला चांगला फ्लॅट आहे. सुंदर सुखवस्तू बायको आहे. गोजिरवाणा मुलगा हिलस्टेशनवरच्या शाळेत शिकतो आहे. ऑफिसात चांगली स्टेनो आहे. घरीसुद्धा नोकर आहेत, चाकर आहेत. सकाळी उठावे, अंघोळ करावी, ऑफिसमध्ये यावे, सहकाऱ्यांशी बोलावे, काम करावे. संध्याकाळी स्वत:च्या मोटारीतून घरी यावे, स्नान करावे, कपडे बदलून बाहेर पडावे. बरोबर साजशृंगार केलेली बायको आहेच. पुन्हा सकाळी उठावे, ऑफिसला जावे...

का, आता का कंटाळता ? अद्ययावत संस्कृतीत आणखी काय दिसायला हवं तुम्हाला ? सगळी सुखं हात जोडून पुढं उभी असताना त्यांचं दर्शन कोणाला का कंटाळवाणं वाटावं ? सुखात काही कमी पडलं तर सांगा. कालच्या दिवसापेक्षा आजचा दिवस वेगळा असला तर बोला. नाहीतर ह्यात काय कमी आहे ते तरी दाखवा. नाही ना ? मग चित्रपट पुढे सुरू तरी राहू द्या...

एके दिवशी श्यामलेंदूची मेव्हणी सुदर्शना येते. हां, आता कसा जिवात

जीव आला वाटते ! म्हणजे जीव गुदमरला होता की काय? तसंच काही नाही. पण थोडी मोकळी हवा आल्यासारखं वाटतं! म्हणजे, एरवी कोंदटल्यासारखं वाटत होतं काय? जखडून टाकल्यासारखं तर नव्हतं वाटत? कोणी अडवलं होतं काय? कसला बांध तर नव्हता ना? सीमा रोखल्याबिखल्या गेल्या होत्या काय? पराक्रमाला वाव होता की नाही? की सीमाबद्ध होता? ते मग शोधू. सध्यातरी सुदर्शना आल्यानं रोजच्या चाकोरीबद्ध जीवनाला नवी पालवी फुटल्यासारखं वाटतंय! सुदर्शनाला श्यामलेंदूविषयी फार आदर वाटतो. कसा हा माणूस यशाच्या पायऱ्या अप्रतिहतपणे चढत गेला आहे, नाही! मग नको आदर वाटायला? पण नुसता आदरच वाटतो की आणखी काही नाजुक भावना आहे? श्यामलेंदूकडून त्या भावनेला प्रतिसाद मिळतो आहे काय? बघा ना कसे सारखे जवळजवळ बसून मोटारीतून हिंडताहेत! जिथे पोहोण्याचे तलाव आहेत अशा हॉटेलात जाऊन जेवण घेताहेत. कबेरा बघायला निःसंकोचपणे बसताहेत. घोड्यांच्या शर्यतीत उत्साहाने भाग घेताहेत...घरी इष्टमित्रांना बोलावून मद्यपानाचा जल्लोष उडवताहेत...तो सुखसाधनांची रास उभवतो आणि ती अनिमिष नेत्रांनी त्या जल्लोषात कधी अशी तर कधी तशी सामील होते. तिला वाटते, कसा धीरोदात्त पुरुष आहे हा! त्याला वाटते, एरवीच्या चाकोरीबद्ध, सीमाबद्ध जीवनात ही कशी निर्झरिणीसारखी मुक्तपणे खळाळते आहे!

पण आतापर्यंत पाहिलेल्या चित्रपटाच्या प्रकृतीवरून असे वाटते, की हे भावकोमल पुष्प ह्या सीमाबद्ध वातावरणात पुरतेपणी उमलण्याच्या आतच कोमेजून जाईल की काय?

आणि एकदा ह्या सीमाबद्ध जीवनात साहसाची संधी येते. साहसाने जीवनाला नवकळा लाभण्याची शक्यता असते. मनाला अपूर्व उन्मेष फुटतात. सीमाबद्ध जीवन 'अनंत अमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा' असे संगीत झंकारणार असे वाटते.

पण हाय! सीमाबद्ध जीवनातले साहससुद्धा मनाने क्षुद्र निघते; अश्वत्थाम्याप्रमाणे अंधारात वार करणारे असते. श्यामलेंदूच्या कारखान्यातून परदेशी पाठवावयाच्या पंख्यांच्यामध्ये काही दोष आढळतो. आता असा माल पाठवला तर परत येण्याचा धोका आणि त्यामुळे आर्थिक नुकसान आणि कंपनीच्या प्रतिष्ठेला तडा. या आपत्तीतून कसा मार्ग काढावा? श्यामलेंदूच्या डोक्यातून कंपनीत संप घडवून आणण्याची युक्ती निघते. त्याप्रमाणे तो संप होईल असे कारस्थान करतो आणि कंपनीला टाळे ठोकतो. परिणामी माल पाठवण्याची तारीख टळते आणि कंपनी एका अरिष्टातून वाचते.

कसले अभद्र साहस हे! कामगारांच्या जीवनाशी क्रूर खेळ खेळणारे हे साहस! आपली कातडी वचावण्यासाठी दुसऱ्याची कातडी सोलणारे साहस! आलिशान फ्लॅट, मोटार, क्लब,

रेसकोर्स, बाहुलीसारखी बायको इत्यादी गोष्टी आलबेल रहाव्यात म्हणून मनाचे मोकळेपणा हरवून बसणारे साहस !

चित्रपटात ह्या क्षुद्र साहसाचा धिःकार कोणी केलेला दिसतो काय ?

प्रथम तरी ह्या विकृत साहसाचा सर्वत्र सत्कार होत असताना दिसतो ! नायकमहाशयांना बढती मिळते. सेल्स-मॅनेजर पदावरून कंपनीच्या डायरेक्टर मंडळावर त्यांची नेमणूक होते. सहकारी अभिनंदन करतात. नायकाचा चेहरा उजळतो. तो घरी फोन करतो. बायकोला प्रसंग साजरा करायला सांगतो. मेव्हणीला फोनवर बोलावतो. पण—

तो घरी येतो. बायकोला आनंदाने भेटतो. पण तरी ह्या आनंदाची खरी पूर्तता अजून झाल्यासारखे वाटत नाही. तो मेव्हणीला हाक मारतो, "सुदूर, सुदूर, ए सुदर्शना—" पण ती ओ देत नाही. थोड्या वेळाने ती संथ पावलांनी आणि उदास चेहऱ्याने नायकासमोर येते. येते आणि काही दिवसांपूर्वी नायकाने दिलेले घड्याळ हातावरून सोडवून नायकाच्या पुढ्यात ठेवते. साभार परत ? हेच त्या साहसाचे स्वागत काय ? तिला त्या क्षुद्रमनस्क नायकाकडून भेटवस्तू घेण्यात, घेतलेली ठेवून घेण्यात अभद्र वाटते. शीः ! काय हे जीवन ! इतके कपटी असते काय हे ?

नायक तिच्याकडे, तिच्या ह्या कृत्याकडे पाहतच राहतो. हरवलेल्या मुलासारखा काहीतरी शोधू पाहतो. पण त्या दोघात आता शतयोजनांचे अंतर पडलेले असते. ते दृश्य कसे थिजल्यासारखे वाटते !

चित्रपट तिथेच संपतो.

अशा वेळी 'पथेर पांचाली 'ची तीव्रतेने आठवण होते. वाटते की ते जीवन कुठे आणि हे जीवन कुठे ? ते जीवन खेड्यातले होते म्हणून कमी चैतन्यमय होते काय ? आणि हे जीवन यंत्रयुगातले आहे म्हणून अधिक रसपूर्ण आहे काय ? त्या जीवनातील पावसात भिजणारे बालपण अधिक निर्भर होते की ह्या जीवनातील रेसकोर्सवर नाचणारे जीवन अधिक निर्भर होते ? पण कशाला ही तुलना करता ? ते जीवनातले संगीत होते आणि हे सीमित बद्ध असणारे क्षुद्र जीवन होते !

सत्यजित रे चा हा नवा 'सीमाबद्ध' चित्रपट पाहताना त्याचे आधीचे चित्रपट उगाचच आठवत होते. त्या सर्वच चित्रपटातील जीवनात भावकोमलता होती, आत्मप्रकाशी साहस होते, एक सत्वशील जिद्द होती. 'सीमाबद्ध' जीवनात ह्याचा मागमूस तरी राहिला होता काय ? आणि ह्या शोध घेण्यात सत्यजित रे मधला दिग्दर्शक फार सावध होता, तत्पर होता. क्षुद्र जीवनातला कंटाळवाणेपणा दाखविण्यासाठी सत्यजित रे यांनी नायकाच्या जीवनातील अर्थशून्य प्रसंगांचा जो चित्रपट मांडला होता तो पाहून कंटाळा क्षणोक्षणी उफाळून येत होता. कंटाळवाण्या जीवनाचा ठसा उमटवण्यासाठी जो दृश्यमालिका आहे त्यात

'पथेर पांचाली 'सारखे काव्य नाही म्हणून हा चित्रपटच कंटाळवाणा आहे असे म्हणणे म्हणजे दोन वेगवेगळ्या चित्रपटांचा आत्मा न ओळखणे होय. एकातले जीवन बंधमुक्त आहे म्हणून चित्रपट चांगला आहे, एकातले सीमाबद्ध म्हणून चित्रपट वाईट असे म्हणणे कलेच्या क्षेत्रात योग्य ठरत नाही. आणि या दृष्टीतून पाहिले म्हणजे 'सीमाबद्ध' चित्रपटासाठी वापरलेली शैली कशी उठावदार आहे हे सहज लक्षात येईल. □ □ □

---


# माणूस

दोन वर्षांची ४५ रुपये वर्गणी

१५ ऑक्टोबरपूर्वी पाठवणारास

## स्नेहांकिता

स्नेहप्रभा प्रधान : किंमत सुमारे २५ रुपये

हे एक पुस्तक

किंवा

## कोठे आणि कधीतरी

डॉ. सुधीर फडके : किंमत १० रुपये

## रातराणी

विजय तेंडुलकर : किंमत १२ रुपये

ही
दोन पुस्तके
विनामूल्य
भेट

चालू डिसेंबरात : ट. ख. वर्गणीदारांचा

## मुक्काम पुणे

पृष्ठ ८ वरून

आटोक्यात आणली गेली. खरे तर, नंतर सामना पूर्ण करता आला असता. पण आपला पराभव अटळ आहे हे जाणून वाडियाने सामन्यातून अंग काढून घेतले! हे एवढे विस्ताराने लिहिले याचे कारण म्हणजे वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या अतिरंजित व वाचकांची दिशाभूल करणाऱ्या बातम्या! खरे पहाता, वाडियाचा मतीन शेख व त्यांचे इतर पाठीराखे यांचे वर्तन इतके असभ्य होते, की पत्रकारांनी कुणाचीही भीडमुर्वत न बाळगता त्यांचे माप त्यांच्या पदरात टाकावयास हवे होते. दुर्दैवाने तसे ते झाले नाही म्हणूनच हा प्रपंच!

गेल्या दोन-तीन वर्षांत क्रिकेटप्रमाणेच हॉकी, फुटबॉल, खोखो, बेसबॉल या सामन्यांतही पंचांच्या निर्णयाविरुद्ध हुल्लडबाजी करण्याचे, पंचांना धमकी देण्याचे सत्र सर्रास चालू आहे. पंच म्हणून उभे राहणे म्हणजे जिवावर उदार होणे अशी परिस्थिती निर्माण होत आहे! वास्तविक, वरील सामन्यातील दोन्हीही पंच हे रणजी ट्रॉफीच्या दर्जाचे आहेत. त्यांचे पूर्वीचे रेकॉर्डही उच्च आहे. असे असतानाही त्यांच्या निर्णयावर अविश्वास दाखविणे हे पराभूत मनोवृत्तीचे लक्षण आहे. आपल्या पंचांना धमक्या दिल्या जातात हे पाहून समजा उद्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने आपले पंच या सामन्यांसाठी पुरविले नाहीत तर? दुसरे असे, पुणे विद्यापीठाला स्वतःचे क्रीडांगण नाही. सर्व सामने हे नेहरू स्टेडियम, पी. वाय्. सी., डेक्कन जिमखाना किंवा पूना क्लब अशा मैदानांवर खेळले जातात. उद्या जर या मैदानांच्या व्यवस्थापकांनी, मैदानाच्या सुरक्षिततेसाठी अशा सामन्यांना मैदान नाकारले तर सामने कुठे घेणार?

असो. क्रीडाक्षेत्राला लागलेली ही कीड नाहीशी करणे आता केवळ विद्यापीठ क्रीडा समितीच्याच हातात आहे. जरब बसविण्यासाठी, असभ्य वर्तन करणाऱ्या संघाला संबंधित स्पर्धेतूनच नव्हे तर सर्व प्रकारच्या स्पर्धांतून तीन-तीन वर्षे बाद करण्याचे अस्त्र विद्यापीठ समिती वापरणार का?

बघू या आता वाडिया संघाविरुद्ध कोणती कारवाई केली जातीय् ते! ◻

## 'स्विफ्ट-१५०' एक मराठी झेप!

मराठी माणसाला उद्योगधंदा, कारखानदारी यांचे वावडेच असते. अर्थात त्याला काही सन्माननीय अपवाद आहेत, पण ते केवळ नियम सिद्ध करण्यासाठीच! अशाच एका अपवादाची ही छोटीशी ओळख!

मराठी बाणा ज्यांच्या केवळ रक्तातच नव्हे, तर नावातही आहे अशा

'मराठे उद्योग समूहा'चे सुरेशराव मराठे व त्यांचे सहकारी राजाभाऊ केळकर यांनी एक मोठा मान मिळविला आहे, आणि तो म्हणजे भारतात प्रथमच ऑफसेट मुद्रणयंत्र तयार करण्याचा! भारतात आतापर्यंत कुणीही हे धाडस केलेले नाही. ऑफसेट मुद्रणयंत्राची गरज आपल्याला परदेशातूनच भागवावी लागते, परदेशातून जी ऑफसेट यंत्रे येतात ती मोठी असतात, त्यांची किंमतही बरीच असते. मोठ्या प्रमाणावर धंदा करणाऱ्यांनाच अशी यंत्रे घेणे परवडते. त्यामुळे लहान सहान कामे करणाऱ्या मुद्रकांना ऑफसेट मुद्रणासाठी नेहमी अशा मोठ्या मुद्रकाकडे जावे लागते.


अशा छोट्या व्यावसायिकांची सोय करण्याचा मराठे-केळकर द्वयीचा मानस होता. अर्थात् हे यंत्र बनविण्यामागे त्यांचा आणखीही एक उद्देश होता. तो म्हणजे 'स्वत:'चा प्रॉडक्ट बनविणे! 'मराठे उद्योग समूहा'त आतापर्यंत निर्मिती होत होती ती केवळ काही प्रसिद्ध कंपन्यांना लागणाऱ्या सुट्या यांत्रिक भागांची! त्या कंपन्यांच्या नावावरच अशा सुट्या भागांची विक्री होते. आता त्यांच्या स्वत:च्या 'स्विफ्ट १५०' या ऑफसेट मुद्रणयंत्राची निर्मिती होत आहे.

हे यंत्र बनविल्यावर त्याची कसून चाचणी घेण्यात आली. निरनिराळ्या रंगात व निरनिराळ्या कागदावर त्यांनी लाखो प्रति छापून पाहिल्या. यंत्राचा कस ध्यानात आल्यावरच त्यांनी विक्रीला सुरुवात केली. मुंबईत त्यांची सहा यंत्रे खपली, पण तोपर्यंत मराठ्यांनी आपल्या यंत्राची कुठलीही जाहिरात केली नव्हती! पण पुण्यातील पहिल्याच यंत्रविक्रीच्या निमित्ताने त्यांनी हा मोका साधला! यासाठी उद्यान-प्रासादात एक शानदार सोहळा आयोजित करण्यात आला होता. मराठी माणूस उत्पादन चांगल्या दर्जाचे करतो, पण त्याची जाहिरात करण्यात तो मागे पडतो हा नेहमीचा अनुभव! पण मराठ्यांनी याही बाबतीत आघाडी मारली! समारंभाला उपस्थित असणाऱ्या प्रत्येकाला त्यांनी 'स्विफ्ट १५०'वर छपाई केलेले आकर्षक नमुने एका सुंदर प्लॅस्टिकच्या आवरणात घालून भेट दिले. शिवाय स्वत: केळकर यंत्राचे प्रात्यक्षिक सतत तीन दिवस पुण्यात दाखवीत होते. प्रत्येक मुद्रणव्यावसायिकाशी चर्चा करून त्यांनी यंत्राची माहिती दिली! – आणि याचा अपेक्षित असा परिणाम झालाच!

- असो, प्रगल्भ बुद्धीच्या अशा या कर्तबगार तरुणांच्या हातीच उद्योग-क्षेत्रात महाराष्ट्राचा झेंडा फडकविण्याचे कार्य सुरक्षित आहे!!

□ □ □

MANOOS (Weekly) 50 Paise : Regd No. MH 649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**